शनिवार । २७ डिसेंबर १९८० । एक रुपया

माणूस

# पोरखेळ

शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून जळगावहून नागपूरला निघालेली डाव्या व लोकशाही आघाडीची दिंडी तशी निरुपद्रवी होती. तिचे गावोगाव स्वागत होत होते, तेही अपूर्व किंवा 'ऐतिहासिक' वगैरे काही नव्हते. तेवढी आदरातिथ्याची परंपरा आपल्या ग्रामीण भागात-विशेषतः विदर्भ-मराठवाड्यात-अद्याप तरी टिकून आहे. ही दिंडी राजकारणी लोकांनी काढलेली होती म्हणून नाके मुरडण्याचेही कारण नाही. शरद जोशी यांच्या शेतकरी आंदोलनामुळे सगळ्याच राजकीय पक्षांना हादरा बसलेला आहे. महाराष्ट्रात खोलवर रुजलेला श्री. यशवंतराव चव्हाण व शरद पवार यांचा काँग्रेसपक्षही याला अपवाद नाही. तेव्हा आपले गेलेले स्थान परत मिळविण्यासाठी वैध मार्गांनी कुणी प्रयत्न करीत असतील तर त्यात आक्षेप घेण्यासारखे काय आहे ? म्हणून दिंडीला कुणाचा तसा तात्त्विक विरोध असण्याचे काहीच कारण नव्हते. ती शांतपणे पार पडू देणे हेच शहाणपणाचे ठरले असते; पण अंतुले सरकारचे आणि या गुणाचे सध्या वाकडेच असावे असे दिसते. त्याशिवाय दिंडीतील नेत्यांना अटक करून विनाकारण प्रक्षोभ माजविण्याचा पोरकटपणा या शासनाने केला नसता ! विशेषतः यशवंतराव चव्हाण यांना अटक करून लगेच सोडून देण्याचा प्रकार तर मूर्खपणाचा कळस म्हटला पाहिजे. यशवंतरावांच्या राजकारणाविषयी कुणाचे कितीही मतभेद असोत; महाराष्ट्राला त्यांनी स्थिर राजवट दिली व सगळ्या थरांतून पाठिंबा व सहानुभूती लाभलेला असा दुसरा नेता अलिकडच्या काळात झाला नाही, ही वस्तुस्थिती कुणालाही मान्यच करावी लागेल. अंतुल्यांचा यशवंतरावांवर राग आहे हे जगजाहीर आहे; पण मुख्यमंत्री झाल्यावर तरी अंतुल्यांनी आपले व्यक्तिगत रागलोभ बाजूस सारून व्यापक लोकभावनेची बूज ठेवायला हवी होती. गोरगरीब जनतेसाठी त्यांना खूप काही, तडकाफडकी करावेसे वाटत असेलही; पण त्यासाठी राजकीय सभ्यतेचे सगळे संकेत मोडलेच पाहिजेत असे नाही. जुन्या काळी संस्थाने होती. त्यांचे नबाब वगैरे असेच अती संतापी, लहरी, उदार वगैरे असत. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत, की असे एखाद्या इतिहासजमा झालेल्या संस्थानचे नबाब ? त्यांना अध्यक्षीय राज्यपद्धती या देशात आणायची आहे; पण बहुधा त्यांना अभिप्रेत असावी अशी एखादी नबाबशाहीच ! असे नसते तर एखादी काटकी मोडावी तसे त्यांनी विधानसभेचे चालू अधिवेशन आठवडाभर अगोदरच कापले नसते व दिंडीच्या नेत्यांना अटक करण्याचा पोरखेळ करून, स्वतःचीच अशी शोभा त्यांनी करून घेतली नसती !

# सप्रेम नमस्कार

¤ 'माणूस'चा दिवाळी अंक वाचला तो नियमितपणे देखणा असण्याची आपली प्रथा आहेच. पण या वर्षीच्या अंकाचे अक्षरशः पान न् पान सुंदर आहे.

'योद्धा शेतकरी' हा विजय परुळकरांचा लेख वाचल्यापासून आपण या शरद जोशीना एकदा बघावं असं वाटू लागलं आहे. त्यांचा 'खैबरनामा' काही इतर अडचणीमुळे अर्धा वाचायचा राहून गेला आणि राहून गेल्याची चुटपूट ठेवून गेला आहे. आपण तो पुस्तकरूपाने प्रसिद्ध करणार असालच. त्या वेळी पुन्हा एकदा सलगपणे वाचता येईल.

अशीच अतिशय भावली ती प्रतिभा रानडे यांची कादंबरी 'अन्वर सलीम'! एकदा हातात घेतल्यावर पुरी केल्याशिवाय ठवलीच नाही. पुरी झाली तेव्हा मन सुन्न झालं होतं.

बेमिसाल श्रीकांत मुंदर्गीचा 'बेमिसाल पांडू खाडे' ही अतिशय आवडला. इतक्या ग्रेट माणसाची ओळख डॉ. मुदर्गीनी करून दिली म्हणून त्याचे आभार! एरवी रेस, जॉकी आणि पांडू खाडे हे काय प्रकरण आहे हे आमच्यासारख्यांना कधीच कळलं नसतं.

'साखरसम्राट' ही रघुवीर मुळयांची कथाही सुरेख! शेवट मात्र तट्कन तुटल्यासारखा वाटला. जनरल थोराताचा मृत्यूचा जबडा त्या प्रसंगाच्या आठवणीनेसुद्धा अंगातर काटा उभा करतो.

लॉरेन्स व काफ्का यांचेवरचे ओळख करून देणारे लेख विशेष भावले नसले तरी ओळख देणारे म्हणून आवडले.

तर 'माणूस'च्या दिवाळी अंकाने दरवर्षीप्रमाणे या वर्षीही काही तरी चांगलं आणि सकस वाचायला दिल्याचं समाधान मिळालं धन्यवाद! येऊ घातलेल्या नूतन वर्षासाठी 'माणूस'ला शुभेच्छा!

२ डिसेंबर ८० — शिरीन हेरवाडकर, मुंबई

¤ 'माणूस'च्या प्रथेप्रमाणे हृया वर्षीच्या दिवाळी-अंकातसुद्धा श्री. शरद जोशीचे विचार, शेतकऱ्यांना बरोबर नेण्याची पद्धत इत्यादीवरील लेख खरोखरच बोधप्रद झाला आहे. श्री. शरद जोशी हृया घटनेकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन वेगळा आहे. साखरेला तीनशे रुपये भाव वगैरेपेक्षा भारतातील ६०–७० टक्के मतदारांवरील मक्तेदारी फोडण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे व त्यामुळे आपल्या सर्वांमधील शिथिलतेस, भोंदूगिरीस तडा जात आहे व भारतीय राजकारणास वेगळी दिशा मिळण्याची आशा निर्माण झाली आहे असे वाटते.

मंत्रालयातील जाणकार सचिवाशी चर्चा करताना मात्र जोशी प्रक्रिया त्यांच्या समजण्याच्या पलीकडील आहे असे दिसते. त्यांचे विचार तीनशे रुपयांतच गुरफटून गेल्यासारखे वाटतात व नोकरीतील बरीच वर्षे कॉंग्रेसच्या पुढाऱ्यासमवेत घालविल्यामुळे त्याच्या विचारशक्तीवर कॉंग्रेस संस्कृतीचा गंज चढला आहे व त्यामुळे श्री. शरद पवारांसारखे हृया संस्कृतीचे ब्राह्मण लवकरच श्री. शरद जोशीचा खातमा करतील असे ते म्हणतात किंवा तशी आशा बाळगून आहेत,

—एक सचिवालयस्थ

¤ माणूसचा दिवाळी अंक वाचला.

'योद्धा शेतकरी' या विजय परुळकर याच्या लेखाने त्यानी व आपण मोठी ऐतिहासिक कामगिरी केली आहे. शरद जोशीचे विचार एवढया विस्तृत प्रमाणात मराठी वाचकांसमोर आणण्याचे महत्त्वाचे कार्य आपण केलेत त्याबद्दल उभयताना धन्यवाद!

आपल्या संपादकीयात आपण म्हटल्याप्रमाणे या सुरू झालेल्या चळवळीत अंतिम टोक ... 'ही शेतकरी चळवळ फुलत वाढत राहिली पाहिजे', हे अत्यंत योग्य आहे. शहरवासियानीसुद्धा या चळवळीस सहाय्य करणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी सुद्धा कोणतेही राजकारण न करता या शेतकरी आदोलनास सक्रिय सहाय्य करणे आवश्यक आहे. दि. १३ डिसेंबरच्या अंकातील योद्धा शेतकरीचा लेखांक दोन वाचला. पुनश्च एकवार धन्यवाद!

शरद जोशीच्या कार्याची व विचाराची माहिती सातत्याने 'माणूस'मधून यावी ही विनंती.

१५ डिसेंबर ८० — शरद जोशी, डोंबिवली


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष** : विसावे

**अंक** : तिसावा

२७ डिसेंबर १९८०

**किंमत** : एक रुपया

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी ४४३४५९

संगमनेरजवळच्या एका पाझर तलावात विहार करणारे हिवाळी पाहुणे, ' सैबेरियन ब्राह्मणी डक्स् ' पाहून माझे निसर्गवेडे मन सुखावले आणि स्वातंत्र्यप्रेमी मन म्हणू लागले–

## सैबेरियन बदकांनो, स्वागत असो !

माझ्या गरीब देशातील,
माझ्या छोटया गावाजवळच्या
छानशा तळयात तुम्ही आलात,
फार बरे वाटले. तुमचे स्वागत असो !
पुण्यामुंबईच्या माझ्या शहाण्या बांधवांना
या गावाची ओळख नाही.
मग या सुदर गावाजवळच्या या सुदर तळयाचा
पत्ता तुम्ही कसा मिळवलात ?
का स्वातंत्र्याच्या तहानेने व्याकुळ होऊन
तुम्ही येथे आलात ?
सैबेरियातील लाल पिंजरा
आता बदकानाही कोडू लागला ना ?
मला वाटायचे तेथे निळी सरोवरे आहेत,
सुखच सुख, सारे आबादी-आबाद आहे.
मी रोज वाचतो, ऐकतो, तुमचा देश
आहे भूतलावरील स्वर्गच !

पण तुम्ही सोल्झेनित्सिन, बाबी मूरप्रमाणे
युरोप-अमेरिकेत न जाता,
माझ्या गावात आला, आनंद झाला !
माझ्या देशातील माती स्वतंत्र आहे,
पाणी खळाळते आहे, हवा मोकळी आहे,
याची जाणीव करून दिलीत मला.

पण इथेही आकाशात सावट येते कधीकधी,
मधूनच हवा कुंद होऊन, कोंडते छाती.
जर कोणी इथे फैलावेल गुलामीचा गॅस,
घेईल आमच्या मुक्ततेचा घास,
तर...तर मीही होईन तुमच्यातील एक,
फिरू आपण नव्या मुक्त भूमीच्या शोधात,
गात–गात ' विपुला च सृष्टी ' !

–डॉ. संजय कोल्हटकर
संगमनेर

पुणे वार्ता

## २१ डिसेंबर : पुणे बंद

वीस डिसेंबरला डाव्या लोकशाही आघाडीच्या नेत्याची अमरावती जिल्ह्यातील पोहरा इथे धरपकड झाली आणि सबंध महाराष्ट्रात एक नाराजीची लहर उमटली. स्वातंत्र्यानंतर ज्यांनी तुरुंग कधीच पाहिला नव्हता असे अरस-कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्राच्या विधानसभेतले विरोधी पक्षनेते शरद पवार, शेतकरी-कामगार पक्षाचे एन. डी. पाटील, गणपतराव देशमुख, जनता पक्षाचे राजारामबापू पाटील इत्यादींचा या अटक झालेल्यांमध्ये समावेश होता. शासकीय सूत्रांनुसार फक्त चारशे ते पाचशे जणाना अटक करण्यात आली होती, तर आघाडीच्या नेत्यांच्या अंदाजानुसार ही संख्या दोन-अडीच हजाराच्या घरात असावी.

ही सारी धरपकड कशासाठी ? तर शेतकरी व शेतमजुराची दिंडी घेऊन हे नेते नागपूर विधानसभेवर चालले होते ! ' शेतीमालाला रास्त भाव दिला पाहिजे ! ' अशी त्याची मागणी होती आणि अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी – २६ तारखेला – दिंडीच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात येणार होतं. तसं पाहाल तर या सर्व प्रकाराला भिऊन जाण्यासारखं काहीच नव्हतं. चारशे-साडेचारशे मैल चालून जर कोणी आले आणि फक्त निवेदन देतो म्हणालं तर आपण त्याचं दोन मैल इकडून चालत जाऊन स्वागत करावं, तुमच्या मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक विचार करतो म्हणायचं आणि सोडून द्यायचं; पण आमचे मुख्यमंत्री बॅ. अंतुलेसाहेब फारच भित्रे निघाले ! काही वाटेल ते झालं तरी या मंडळींना नागपूरच्या वेशीला स्पर्श करू द्यायचा नाही, असा त्यांनी चंगच बांधला. पोहऱ्याजवळ जगलात धरपकड झाली. आघाडीचे नेते हिरो ठरले. त्यांच्यावरील ' अमानुष अत्याचारा 'च्या निषेधार्थ रविवार ता. २१ डिसेंबर रोजी ' महाराष्ट्र बंद 'चा आदेश आघाडीतर्फे देण्यात आला,

बाकी काहीही म्हटलं तरी रविवारची सकाळ हा काही अजबच प्रकार असतो. त्या दिवशी सूर्य तोच उगवत असला तरी त्याचं ऊन निराळं वाटत असतं. हा रविवार तर आणखीनच निराळा होता ! ' बंद 'चा दिवस! आजपर्यंत राजकीय नेत्याच्या आदेशानुसार अनेक वेळा पुणं बंद राह्यलं असेल; पण त्या वेळी एकदाही रविवार नव्हता ! त्यामुळे रविवारचा ' बंद ' हा पुणेकरांना एक नवाच अनुभव होता.

सकाळचे साडेनऊ–दहा वाजले तरी जेव्हा बहुसंख्य दुकानं बदच राह्यली तेव्हा ' बंद 'चं वातावरण खऱ्या अर्थानं जाणवायला लागलं. लक्ष्मीरोडवर मंडळी घोळक्याघोळक्यानं उभी राहून कालच्या अटकसत्राची चर्चा करत होते. अंतुले आणि शरद पवारांच्या अ क्क ल – बे अ क ली प णा व र अधिकार–वाणीनं मतं व्यक्त करत होते. याबाबतीतला पुणेकराचा निधडेपणा आणि आत्मविश्वास खरोखरच वाखाणण्याजोगा असतो.

सकाळी दहाच्या सुमारास पुणे शहर युवक काँग्रेसचे कार्यकर्ते अलका टॉकीजच्या चौकात जमले. अखिल भारतीय युवक काँग्रेसचे अध्यक्ष सुरेश कलमाडीही तिथे आले. पुण्याच्या पोलीस आयुक्तानी आदल्या दिवशीपासूनच जमावबदीचा हुकूम लागू केला होता; पण निदर्शकानी विनंती केल्यामुळे पोलिसानी त्याना अलका टॉकीज चौकातच अटक न करता सिटी पोस्ट चौकापर्यंत जाऊ दिले. सुमारे पाऊणशे–शंभरजणाच्या या मोर्चात वीस–पचवीस स्त्रियाही होत्या. सिटी पोस्ट चौकात पोचल्यावर सर्वांनी तिथे बैठक मारली. श्री. कलमाडीनी तिथे छोटंस भाषण करून ' बंद'ला उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल पुणेकर नागरिकाचे आभार मानले, तसंच एका महिन्यात अतुलेशासन खाली कोसळेल ! असा इशाराही दिला.

अशाच तऱ्हेने स्वारगेट, गणेशपेठ पोलीस चौकी, सोन्या मारुती चौक, हडपसर इत्यादी ठिकाणीही भाई वैद्य, सुरेश तौर, आमदार विठ्ठल तुपे या नेत्याच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह झाले. दिवसभरात एकूण २१० जणांना अटक करण्यात आली.

दुपारनंतर शहरातला ' बद 'चा जोर ओसरला. कारण सर्वच राजकीय नेत्यानी अहमहमिकेने सत्याग्रह करून स्वतःला अटक करवून घेतली होती. त्यामुळे दुपारनंतरही ' बंद 'ची पकड कायम ठेवायला कोणी उपलब्धच नव्हतं. शहरातली बरीचशी दुकानं आणि हॉटेलं संध्याकाळी उघडली. चित्रपटगृहंही चालू झाली. त्यामुळे ' बंद 'चा सकाळी जाणवणारा प्रभाव बराच कमी झाला पी. एम टी. च्या सकाळी बंद असणाऱ्या बसेसही संध्याकाळी सुरू झाल्या आणि रविवारची ' सकाळ ' जरी निराळी झाली होती, तरीही संध्याकाळ इतर रविवारच्या संध्याकाळीपेक्षा फारशी निराळी राहिली नव्हती ▫

## सतीची प्रथा स्त्रियांनीच मोडून काढावी–श्री. गोरे

१५ डिसेंबर १९८० ! पुण्यातलं टिळक स्मारक मदिराच सभागृह. लीग फॉर सोशल जस्टिस या स्त्रियाच्या हक्कासाठी झगडणाऱ्या संस्थेतर्फे आज या ठिकाणी सतीच्या प्रश्नावर चर्चात्मक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. ज्येष्ठ समाजवादी नेते नानासाहेब गोरे, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम ताकवले, दैनिक 'केसरी'चे संपादक चंद्रकांत घोरपडे, मारवाडी समाजाचे प्रतिनिधी कनकमल मुनोत, बॅ. सुनीती पुगलिया, तसेच सुजाता देशमुख व रमण देशपाडे हे युवक प्रतिनिधी या विषयावर आपली मतं व्यक्त करणार होते. अशा तऱ्हेचा कार्यक्रम आयोजित करण्याला कारणही तसंच होतं.

निमडी कोठारिया आणि हाथीरेह ही राजस्तानातली दोन लहानशी खेडी. चार-सहा महिन्यापूर्वी या खेड्यांमध्ये दोन स्त्रिया स्वच्छ सती गेल्या. विसाव्या शतकाची अवघी दोन दशकं उरली असताना घडलेल्या या घटना सबध मानवजातीला हादरवून टाकणाऱ्या ! असं काही पाह्यलं, ऐकलं, वाचलं की, ' आपण सुधारणेकडे वाटचाल करत आहोत ' हे विधान अगदीच पोकळ, हास्यास्पद आणि लाजिरवाणं वाटायला लागतं.

२९ फेब्रुवारी १९८० ला निमडी

मलपृष्ठ १ वर

# नागपूर अधिवेशन

## संसदीय प्रथा डावलल्या

वा. दा. रानडे

संसदीय पद्धती यशस्वीपणे राबविण्यात विरोधी पक्ष अडथळे आणीत आहेत म्हणून अध्यक्षीय पद्धती हवी असा प्रचार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री अंतुले करीत आहेत; पण त्यांनी नागपूर अधिवेशन नियोजित कार्यक्रमाच्या एक आठवडा आधी संपविण्याचा निर्णय ज्या पद्धतीने घेतला त्यावरून संसदीय पद्धती यशस्वीपणे राबविण्यात कोण अडथळे आणीत आहे हे स्पष्ट झाले आहे. शेतकरी दिंडीला सामोरे जाण्याचे धैर्य अंतुले सरकारला नसल्याने तो प्रसग टाळण्यासाठी अधिवेशन लवकर संपविण्याचे सरकारने ठरविले. आधी जाहीर झालेल्या कार्यक्रमाप्रमाणे अधिवेशन एक जानेवारीपर्यंत चालावयाचे होते व ते लक्षात घेऊनच २९ डिसेंबरला नागपूरला शेतकरी दिंडी आणण्याचे डाव्या व लोकशाही आघाडीने ठरविले होते आणि तसे जाहीरही केले होते. असे असता २६ डिसेंबरला अधिवेशन सपविण्याचा निर्णय हा सरळ पळपुटेपणा होता जाहीर केलेल्या कार्यक्रमाप्रमाणे अधिवेशन पार पडणे, अगदी सबळ कारणाशिवाय त्यात बदल न करणे ही संसदीय प्रथा आहे. सत्तारूढ इंदिरा काग्रेस पक्षाने ती मोडली. कारण अधिवेशन लवकर संपविण्यास कोणतेही सबळ कारण नव्हते. अधिवेशने लवकर केव्हा संपविली जातात ? अधिवेशनासाठी योजलेले काम वेळेआधी पुरे होणार असेल तर अधिवेशन लवकर सपविण्यास कोणी आक्षेप घेण्याचे कारण नाही. चर्चा अपेक्षेपेक्षा लवकर संपते व असे काही वेळा होऊ शकते; पण ते कारण या निर्णयामागे नव्हते. अधिवेशन लवकर संपविण्याच्या निर्णयाच्या आदल्याच दिवशी कामकाज सल्लागार समितीची बैठक भरून अधिवेशन १ जानेवारीस न सपविता आणखी एक दिवस लाबविण्याचा

निर्णय एकमताने घेण्यात आला होता. याचा अर्थ अधिवेशनापुढील नियोजित कार्यक्रम पुरा करण्यासाठी ते लवकर संपविणे तर शक्य नाहीच, उलट त्याची मुदत १ दिवसाने वाढवायला हवी असे कामकाज सल्लागार समितीला वाटले व तिने एकमताने तसा निर्णय घेतला. हा निर्णय एकमताचा होता हे विशेष महत्त्वाचे आहे म्हणजे कामकाज सल्लागार समितीवरील सत्तारूढ पक्षाच्या सभासदाना सुद्धा अधिवेशनापुढील नियोजित कामकाज दोन जानेवारीपूर्वी पुरे करता येईल असे वाटत नव्हते. असे असता सरकारने दुसऱ्या दिवशी एकदम लहरीप्रमाणे अधिवेशन लवकर संपविण्याचे ठरविले आणि कामकाज सल्लागारसमितीची बैठक पुन्हा बोलावून अधिवेशन लवकर संपविण्याचा निर्णय एकमताऐवजी बहुमताने घेतला. या समितीचे निर्णय एकमताने घ्यावयाचे ही दुसरी संसदीय प्रथा मोडण्यात आली. कामकाज सल्लागार समिती विधानसभेची समिती आहे. विरोधी पक्षाना विश्वासात घेण्याच्या दृष्टीने तिने एकमताने निर्णय घेण्याची आतापर्यंतची प्रथाच योग्य आहे. बहुमताने निर्णय घ्यावयाचे तर या समित्या हव्यातच कशाला ? विधिमंडळात सत्तारूढ पक्षाचे बहुमत आहे. आपल्याला पाहिजेत ते निर्णय तो बहुमताने घेऊ शकतो; पण केवळ बहुमताच्या लोकशाहीपेक्षा विरोधी पक्षाशी संवाद साधून शक्यतो एकमताने निर्णय घेणे ही अधिक उच्चतर लोकशाही आहे. सर्वच प्रश्नाच्या बाबतीत हे जमेल असे नाही. निरनिराळ्या पक्षाच्या भिन्न तात्त्विक भूमिका, धोरण व कार्यक्रम लक्षात घेता अशा एकमताची अपेक्षा करणेही चुकीचे आहे; पण गृहापुढील कामकाज-कार्यक्रम एकमताने ठरविण्याच्या बाबतीत काही तत्त्वनिष्ठा, धोरण आड येण्याचे कारण नाही. विधिमंडळात बहुमताने निर्णय घेण्यास आणि आपल्याला हवी असलेली विधेयके, ठराव पास करून घेण्यास सत्तारूढ पक्ष मोकळाच आहे. गृहापुढील कामकाज कार्यक्रम विरोधी पक्षाशी विचारविनिमय करून एकमताने ठरविण्याची सहिष्णुता त्याने दाखवायला हवी; पण मुख्यमंत्री अंतुले आणि त्याच्या नेतृत्वाखालील सत्तारूढ पक्ष याना अशा सहिष्णुतेचे वावडे आहे. विरोधकांबद्दल जोड्याची भाषा अंतुले यानी आपल्या भाषणातून पूर्वी वापरलेलीच आहे आणि त्याबद्दल शब्दानेही खेद प्रदर्शित न करता त्याचे समर्थन त्यानी केले आहे ऐंशी टक्के लोकांचा आम्हाला पाठिंबा आहे. विरोधी वीस टक्के लोकांच्या मताला आम्ही कशासाठी किंमत द्यायची असा त्याच्या भाषणाचा सूर असतो याबाबत प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, इंदिरा कांग्रेसला ८० टक्के लोकाचा पाठिंबा असण्याची भाषा फसवी व दिशाभूल करणारी आहे. त्या पक्षाला दोनतृतियांश व काही राज्यात ८० टक्के जागा मिळाल्या असतील; पण इंदिरा काग्रेसला किती टक्के मते मिळाली हे लोकमताच्या पाठिंब्याचे खरे निदर्शक आहे. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत इंदिरा काग्रेसला अवघी ४२ टक्के मते मिळाली आणि विधानसभा निवडणुकीतही त्यात फारसा फरक पडलेला नाही. तेव्हा ८० टक्के लोक आमच्यामागे आहेत हा अंतुले याचा दावा फसवा आहे आणि एवढा प्रचंड पाठिंबा सत्तारूढ पक्षाला आहे असे एक वेळ गृहीत धरले तरी विरोधी पक्षाला त्यांनी कस्पटासमान लेखणे लोकशाही वृत्तीशीच विसंगत आहे. विधानसभेत आणि लोकसभेत आपल्या मागे बहुमत आहे, आपण करू ती पूर्व दिशा, आपणास कोण रोखतो अशी बेपर्वाईची आणि बेजबाबदारपणाची वृत्ती १९७१–७२ च्या निवडणुकीतील विजयानंतर सत्तारूढ पक्षात बळावली होती. त्याचीच पुनरावृत्ती सध्या घडताना दिसत आहे. लोकशाहीच्या निकोप विकासास ही प्रवृत्ती घातक असून ही वाट एकाधिकारशाहीकडे नेणारी आहे. आणीबाणीत त्याचा एकदा कटु अनुभव घेतल्यानंतर देशाला पुन: त्या मार्गाने जाऊ द्यावयाचे नाही याबद्दल सर्व लोकशाहीवाद्यानी अत्यंत जागरूक राहिले पाहिजे.

अधिवेशन २६ डिसेंबरला संपविण्याचा निर्णय सरकारने घेतल्यानंतर विरोधी पक्षानीही दिंडी २९ डिसेंबरऐवजी २६ डिसेंबरलाच नागपूरला आणण्याचे ठरविले. तेव्हा दिंडी येऊ नये यासाठी दडपशाहीचे उपाय योजायला सरकारने सुरुवात केली दिंडी ज्या भागातून जात होती त्या भागात जमावबंदीचे निर्बंध पुकारण्यात आले. पोहरा येथे यशवंतराव चव्हाण, शरद पवार, एन. डी. पाटील, राजारामबापू पाटील आदि विरोधी पक्षनेत्यांना आणि दिंडीतील जवळजवळ पाचशे लोकाना अटक करण्यात आली. त्यापैकी चव्हाणांची नंतरलगेच मुक्तता करण्यात आली व चांदूरच्या मॅजिस्ट्रेटनी इतरांचीही मुक्तता केली या धरपकडीच्या निषेधार्थ विरोधीपक्षांतर्फे रविवारी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला. ही दडपशाही कोणत्याही दृष्टीने समर्थनीय नव्हती. दिंडी शांतपणे चालू होती.कोणतेही हिंसाचार घडले नव्हते. कायदा व सुव्यवस्थेस कोणताही अडथळा आलेला नव्हता. अशा परिस्थितीत जमावबंदीचे निर्बंध पुकारण्याची आणि दडपशाहीची काहीही आवश्यकता नव्हती. या धरपकडीची आषणास कल्पना नव्हती, शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तुम्हाला योग्य वाटतील ते उपाय योजण्याच्या सूचना स्थानिक अधिकाऱ्याना आम्ही दिल्या होत्या असे अंतुले यानी सांगितले. या धरपकडीत लोकशाहीविरोधी काही नाही असेही दडपशाहीचे न पटणारे समर्थन त्यानी केले.

आणखी एक महत्त्वाचा प्रश्न विदर्भातील जनतेच्या भावनाचा. विधिमंडळ अधिवेशनाच्या काळात मंत्र्याना भेटून आपली गाऱ्हाणी मांडण्याची अनिर्णित प्रश्न मार्गी लावण्याची संधी लोकाना असते. अधिवेशनाचा कार्यक्रम लक्षात घेऊन आपल्या सोयीसवडीनुसार ही कामे करण्याचे त्यानी ठरविलेले असते; पण अधिवेशन २६ डिसेंबरलाच संपविण्याच्या निर्णयाने ज्यानी २६डिसेंबर नंतर ही कामे योजलो असतील त्याची ती कामे राहूनच गेली असणार. नागपूर अधिवेशन लौकर संपविले जाते. हा आपल्या भागाबद्दल सरकारला आस्था नाही याचा आणखी एक पुरावा अशी तेथील जनतेची प्रतिक्रिया होणे स्वाभाविक आहे. ☐


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# सासवडचा 'पाणी पंचायत' मेळावा

# आंदोलनाची पूर्वतयारी : 'चलो मुंबई'

शेतकरी संघटनेच्या आंदोलनाने महाराष्ट्रात आज चांगलीच खळबळ उडवून दिली आहे, वातावरणात एक ताण निर्माण केला आहे. याच वेळी पुरंधर तालुक्यातील 'पाणी पंचायत' आंदोलन करण्यासाठी कटिबद्ध झाली आहे. आपल्या मूलभूत हक्कासाठी संघटितपणे लढा देण्याचे आवाहन जिराईत शेतकरीबंधूंना पाणी पंचायतीने केले आहे. दि. १३ डिसेंबर रोजी सासवड येथे एक शेतकरी मेळावा यासाठी घेतला गेला होता. दि. १३ डिसेंबरला सासवड येथे पार पडलेल्या या मेळाव्यात मी 'ग्रामायन' व 'माणूस'च्या वतीने उपस्थित होतो. राजकीय पक्षाचे तसेच सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत यांच्यापुढे कोणत्या परिस्थितीत आपण आंदोलनाच्या निर्णयास आलो आहोत ते मांडावे, आंदोलन कोणत्या तत्त्वावर आधारित व कोणत्या मागण्यांसाठी राहील ते जाहीर करावे, या मान्यवर कार्यकर्त्यांचे मार्गदर्शन, तसेच त्यांचा सहभाग, किमान पाठिंबा मिळवावा आणि उपस्थित शेतकऱ्यांना या प्रश्नावरील त्यांच्या तीव्र भावना व्यक्त करण्यास संधी देऊन, त्यांच्याशी चर्चा करून आंदोलनाची व्यापक आखणी करावी इत्यादी उद्देशांनी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पाणी पंचायतीने हाती घेतलेल्या मुख्यत: पुरंधर तालुक्यातील तीस सामुदायिक उपसा सिंचन योजनांचे सभासद शेतकरी मेळाव्यास उपस्थित होते. उत्साहाने जमलेल्या सुमारे ५०० स्त्री–पुरुष शेतकऱ्यांनी सासवड नगरपालिकेचे सभागृह पूर्ण भरले होते. मात्र स्थानिक व पुण्याहून आलेल्या आजी-माजी आमदार, सभापती, उपसभापती, कामगारपुढारी आदी राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांनी आपली भाषणांची हौस पुरवून मेळाव्याचा बेरंग केला. उपस्थित शेतकऱ्यांच्या उत्साहावर केवळ शब्दांचे पाणी ओतले असेच म्हणावयास हवे. मेळाव्याच्या शेवटी आभार मानताना पाणी पंचायतीचे कार्यकर्ते श्री. पोपटराव खेसे यांनी आपली ही व्यथा स्पष्टपणे बोलून दाखविली हे फार चांगले झाले.

मेळाव्याच्या प्रारंभी पाणी पंचायतीचे एक कार्यकर्ते श्री. नारायणराव पाटोळे यांनी मागण्यांचे निवेदन वाचून दाखविले आणि नंतर थोडक्यात समयोचित असे भाषणही केले. नारायणरावांच्या भाषणात जी तळमळ आणि जो आवेश होता त्याच सुरात पुढील भाषणे व्हायला हवी होती; परंतु पट्टी निराळीच लागली आणि आंदोलनाच्या तयारीसाठी जमलेले शेतकरी काही स्फुरण घेऊन परतण्याऐवजी शेवटी कंटाळून एस्. टी. गाठण्यास पसार झाले. त्याचा नाइलाज होता.

महाराष्ट्रातील शेतकरी आंदोलन मुख्यत: शेतमालाच्या भावासाठी आहे; परंतु शेतीची जी मूलभूत गरज पाणी, त्यासाठी पाणी पंचायतीचे आंदोलन आहे, हे निवेदनाच्या प्रारंभीच स्पष्ट करण्यात आले होते. पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन केले तर महाराष्ट्रातील पन्नास लाख वंचित खातेदारांना कमीत कमी पाच माणसांच्या कुटुंबाला अडीच एकर (माणशी अर्धा एकर या तत्त्वाने) इतके सिंचनक्षेत्र उपलब्ध करून देणे सहज शक्य आहे. यामुळे महाराष्ट्राचे शेतीचे उत्पन्न आजच्यापेक्षा तिपटीने वाढेल व रोजगारीचा प्रश्न सुटेल, मिळकतीची विभागणी समाजातील सर्व थरात विखुरली जाईल. त्यामुळे सर्व समाजाची आर्थिक पातळी वाढेल व आज खेडी आणि शहरे यामध्ये वाढत असलेली आर्थिक विषमतेची दरी आपोआपच सांधली जाईल. निवेदनातील या भागाविषयी चर्चा होऊ शकेल परंतु ग्रामीण भागाच्या विकासासाठी अब्जावधी रुपये खर्च होऊनही राष्ट्रीय नियोजनात अशा तऱ्हेचा प्रयोग झालेला नाही. तेव्हा शासनाने पाणी पंचायतीच्या प्रयोगाची दखल घेऊन दुष्काळी भागातील शेतकऱ्यांच्या या विधायक मागण्यांचा तातडीने विचार करावा. मताना हावऱ्या राजकारण्यांना पन्नास कोटीच्या कर्जमाफीची घोषणा तडकाफडकी करता येते, परंतु मूलभूत समस्या सोडविण्यासाठी रक्ताचे पाणी करून पाणी पंचायतीचे कार्यकर्ते शासनापुढे आपल्या मागण्या मांडीत आहेत तर त्यांच्या पत्रव्यवहाराला पोच देण्यासाठी या नेतेमंडळींना सवड होत नाही. अशा परिस्थितीमध्ये कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला तर त्यात वावगे काय आहे ?

पाण्याचे वाटप जमिनीच्या प्रमाणात न करता माणसाच्या प्रमाणात करावे, उपलब्ध पाण्याचा वापर अधिक किफायतशीर करण्यासाठी उसासारखी खूप पाण्याची पिके टाळावी, योजना आपली आहे ही जबाबदारीची भावना सभासदांमध्ये यावी यासाठी योजनेच्या खर्चाच्या वीस टक्के रक्कम सभासदांनी स्वतः भरावी, या विचारावर पाणी पंचायतीचा कार्यक्रम आधारित आहे, याचा उल्लेख करून पाणी पंचायतीच्या पाच मागण्या पत्रकात दिल्या आहेत. शेतीसाठी माणशी अर्धा एकर पाणी हे तत्त्व सरकारने मान्य करावे, त्यासाठी गावपातळीवर पाण्याचे नियोजन करावे व आजचे असमतोल वाटप दूर करण्यासाठी पाण्याचे एकत्रित नियोजन करावे, अनुदानाची पद्धत सोइस्कर करून अनुदानाची रक्कम सध्याच्या ४० टक्क्याऐवजी ८० टक्क्यापर्यंत वाढवावी, पाटाच्या पाण्यापेक्षा छोट्या उपसायोजनांच्या पाण्याच्या वापरासाठी दरवर्षी एकरी ६० ऐवजी १२० रुपये खर्च येतो म्हणून एक हेक्टरपर्यंत ह्या अधिक खर्चाची वार्षिक सबसिडी द्यावी, अशा उपसायोजनांना सरकारी भांडवली खर्चाने तीन महिन्यात वीज पुरवावी व रेव्हेन्यू रिटर्नचे तत्त्व या योजनांना लागू करू नये अशा या पाच मागण्या आहेत. मागण्यांचे निवेदन वाचून श्री. नारायणराव पाटोळे आपल्या भाषणात म्हणाले, 'हा गरिबांचा लढा आहे. आपण तो जिद्दीने लढवायचा आहे. पाणी पंचायतीच्या योजनेचा ज्यांना आजपर्यंत लाभ

झाला आहे त्यानी तो इतराना मिळावा यासाठी लढायचे आहे !'

'सरकारी भाडवलाचा फायदा सर्वांना समान मिळायला हवा. तसे न होता आज फक्त कॅनॉलच्या कडेकडेने नवी स्वदेशी भाडवलशाही पोसली जात आहे.

'ऐंशी टक्के अनुदानाची मागणी ही आकड्याने जास्त वाटेल; पण आम्ही ती देशाकरिता मागतो. योजनेच्या खर्चाची वीस टक्के रक्कम घरातील किडुकमिडुक विकून किंवा जमेल त्या मार्गाने शेतकरी आगाऊ भरीत आहेत हे बंधन देशाला शिस्त लावण्यासाठी आहे. हे केवळ मागण्याचे आदोलन नाही. ऐंशी टक्के मिळाले तरी विजेचा प्रश्न राहतोच. त्याचीही सोडवणूक व्हायला हवी !

'शेतकरी बधूनो, तीन माणसासाठी तीस लाख सरकारी खर्च सयुक्तिक आहे का? थोड्या लोकानी लोण्याचा गोळा खायचा आणि आम्हाला मातीत घालायचे हे यापुढे चालणार नाही !'

श्री. ना. ग. तथा नानासाहेब गोरे मेळाव्यास येणार होते; परंतु काही कार्यक्रमासाठी ते रत्नागिरीला गेल्याने आले नाहीत. त्यांचा 'साधने'त आलेला लेख या प्रसंगी वाचून दाखविण्यात आला. त्याचा मतितार्थ असा-पाणीपंचायतीचा प्रयोग मूलभूत स्वरूपाचा आहे केवळ शेती उत्पादनाचे भाव वाढवून मिळाल्याने कोरडवाहू शेतकऱ्याचे प्रश्न सुटणार नाहीत उलट, आज जे वरच्या पायरीवर आहेत त्याच्या तुलनेत तो अधिकच दुबळा होईल; साळुके याच्या मागणीत आर्थिक, सामाजिक समतेचे सूत्र आहे व याच दृष्टीने शरद जोशीच्या आदोलनापेक्षा ते वेगळे आहे.'

यानतर पाणी पचायतीचे एक कार्यकर्ते बोलले. त्यांनी पाणी पंचायतीच्या बॅजवरील चित्राचा अर्थ स्पष्ट करून सागितला. चित्रात मध्यभागी ओळीने पाच शेतकऱ्याचे मुखवटे आहेत. त्यातील मधल्याचे तोड पाढरे व बाकी चौघाची काळी. आकाशातून पडणाऱ्या पाण्याचा फायदा फक्त हा मधला एक शेतकरीच घेतो आहे, हे चित्र आपल्याला बदलायचे आहे ते पुढे म्हणाले, 'नायगावचा हा छोटा वेल आता महाराष्ट्रात पांगायला लागला आहे. पुरंधर तालुक्यात पाणी पंचायतीचे बीज निर्माण व्हायला परंपरा आहे. पुरंधरच्या तहापासून महात्मा फुले, उमाजी नाईक, आचार्य अत्रे अशी ही ऐतिहासिक परंपरा आहे.'

पाणीपचायतीचे आणखी एक कार्यकर्ते बोलले. ते म्हणाले, 'आतापर्यंत सर्व मंडळीना सागूनही आपली मागणी मान्य झाली नाही. आता विधानसभेच्या अधिवेशनात जाऊन आपण ती माडणार आहोत, ८७ दुष्काळी तालुक्यातील आमदाराना सागणार, हा केवळ आमचा-पुरधर तालुक्याचा-प्रश्न नाही तो तुमचाही आहे तुम्ही सरकारला एकजुटीने सागा ! सरकारने ऐकले तर ठीकच आहे. नाही तर जानेवारीमध्ये मुबईला जाऊन आपल्याला आदोलन लढवावे लागेल. त्याची सर्वांनी तयारी ठेवावी !'

यानंतर तालुक्याचे अरस काँग्रेसचे तरुण आमदार श्री. संभाजीराव कुंजीर बोलले, 'पाणी ही राष्ट्रीय संपत्ती आहे. म्हणून पाणीवाटप जमीनधारणेवर नव्हे तर माणसांवर अवलबून ठेवायचे हे पाणी पचायतीचे तत्त्व आहे. याचाच अर्थ संपत्तीचे समान वाटप करायचे, हीच समाजवादाची कल्पना आहे मंत्री, शासकीय मंडळी जर आपल्या मागण्या ऐकून घ्यायला तयार नसतील तर आपल्याला रस्त्यावर यावे लागेल. दुष्काळात पिचलेली ही माणसे आहेत. त्याना वर काढण्याचा प्रयत्न करणार की नाही हा आमचा शासनाला सवाल आहे. अल्पभूधारकाच्या सवलती, दुष्काळी भागातील माळरानावर शेती करणाऱ्या मोठ्या भूधारकानाही मिळाव्यात असे माझे म्हणणे आहे.

'दुष्काळी भागाचे प्रश्न सोडविण्यासाठी पाणी पंचायतीच्या माध्यमातून चळवळ सुरू झाली आहे. आता राजकारण न आणता, त्याला सर्वांनी एकजुटीने साथ देऊन आपल्या मागण्यासाठी विधानभवनावर धडक द्यायची आहे.'

यानंतर मेळाव्याचे प्रमुख पाहुणे श्री. एसेम् जोशी बोलले. आदल्या दिवशीच पाय अडखळून पडल्याने अण्णाचे गुडघे दुखत होते तरीही, वार्धक्यात जिथे-जिथे बी रुजते आहे, रोप उगवते आहे तिथे तिथे जाऊन पाणी घालण्याचे काम तरी करावे, या भूमिकेतून ते मेळाव्याला आले होते. आपल्या भाषणात ते म्हणाले, 'हा लढा पूर्णतः न्याय्य आहे. त्याला देशातील सर्वांनी पाठिंबा द्यायला हवा. समाज बदलण्याची बीजं या योजनेत आहेत. सपूर्ण गावाला वर उचलायचे ही अतिशय न्याय्य मागणी आहे. लोकाना आपले कर्तव्य सागून, ते पूर्ण करण्याचे शिक्षण साळुके व पाणी पंचायतीचे अन्य कार्यकर्ते देत आहेत. हे अतिशय अवघड काम आहे.

'तुमची मागणी रास्त आहे. ती मान्य करीत नसतील तर त्यासाठी लढा द्यायला हवा. दुर्बळाचे कोणी ऐकून घेत नाही हे खरे; पण सबळ होताना आत्मशक्ती हवी, चागले बळ वाढवायला हवे आज तुमच्या लढ्याचा सकल्पाचा दिवस आहे म्हणून मी आलो. या तपस्येमध्ये मी तुमच्याबरोबर आहे!'

पुरदरचे माजी आमदार श्री दादा जाधवराव यानी यानंतर भाषण केले. ऐंशी टक्केच काय शभर टक्के सबसिडी शासनाने द्यावी, पाणी पंचायतीला आमचा पाठिंबा आहे; पण समान पाणीवाटप हे शक्य होणार नाही, उसाशिवाय उपसायोजना चालविणे शक्य होणार नाही, तालुक्यात आपण शेतकरी संघटनेची स्थापना केली असून हे आदोलन कसे महत्त्वाचे आहे, इत्यादी मुद्दे दादानी आपल्या खास ढंगात पेश केले व शेवटी पुन्हा एकदा मतभेद असूनही एकजुटीने सर्वांनी पाणी पंचायतीच्या आदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन केले.


श्री. ताकवले गुरुजी यानी सागितले, 'प्रौढ शिक्षण, कुटुंबनियोजन इत्यादींचा आम्ही शिक्षक गावोगाव प्रचार करतो तसाच पाणी पचायतच्या समान पाणीवाटप तत्त्वाचाही करावा असे मला वाटते.' तालुका काँग्रेस आयचे अध्यक्ष श्री. भिकुतात्या जगताप यानी, राजकारण न आणता शासनाने मागण्या मान्य कराव्यात व त्या मान्य करून घेण्यासाठी तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांनी एकजुटीने प्रयत्न करावेत असे आवाहन केले. लोकदलाचे कार्यकर्ते श्री. रत्नाकर महाजन म्हणाले, 'हवा, सूर्यप्रकाश या गोष्टी जशा सर्वांसाठी आहेत तसे पाणीही आहे. 'पाण्यावर सर्वांचा समान हक्क' या पाणी पंचायतीच्या तत्त्वामध्ये शेतकऱ्याचाच नव्हे तर शेतमजुराचाही पाण्यावर हक्क आहे हे अनुस्यूत आहे. या दृष्टीने हा क्रातिकारी प्रयत्न आहे. पाणी पंचायतीच्या मागण्या मान्य व्हायला हव्यात. एकूणच नियोजन



“कठीण आणि खरखरीत
टूथ पावडरी तुमच्या
हिरड्या नि दातांना
इजा करू शकतात...”

# कोलगेट टूथ पावडरने तुमच्या दातांचे नि हिरड्यांचे संरक्षण करा — श्वास दुर्गंधीही थांबवा!




**कोलगेट टूथ पावडर** अत्यंत बारीक आणि पांढरीशुभ्र असते. तुमच्या हिरड्यांचे हळुवारपणे मालिश करीत असतानाच, तिच्यातील सौम्य तकाकीदायक द्रव्याने तुमच्या दातांवरील कीटण दूर होऊन, दात अधिक स्वच्छ व शुभ्र बनतात. कोलगेट टूथ पावडरचा विपुल फेस दातांच्या फटीत आरपार शिरतो आणि त्यामुळे दुर्गंध दूर होऊन दंतक्षय करणाऱ्या किडींचा नायनाट होतो.

**कोलगेट टूथ पावडरने तुमच्या कुटुंबियांना आधुनिक दंत संरक्षण द्या. त्यांना तिचा पेपरमिंटचा थंडगार स्वाद खचितच आवडेल.**

TP.G.30 MR


शहरांसाठी आहे ते बदलून खेड्यांच्या विकासासाठी नियोजन व्हायला हवे!’

सभापती श्री. बाळासाहेब मुळिक यांनी दादा जाधवरावांच्या बहुतेक मुद्द्यांशी सहमत व्यक्त केले व पाणी पंचायतीच्या, त्याचप्रमाणे भूविकास बँकेच्या अर्थपुरवठ्यातून होणाऱ्या उपसायोजनांचाही शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा, अलीकडेच आपण १९ उपसायोजनांचा सर्व्हे करून त्यांची शिफारस भूविकास बँकेकडे केली आहे असे त्यांनी सांगितले.

सांगोला तालुक्यातील एक कार्यकर्ते मेळाव्यास मुद्दाम आले होते. एक हजार एकरांची दुष्काळी भागातील सामुदायिक उपसायोजना बंद पडली होती; परंतु पाणी पंचायतीच्या मार्गदर्शनाने ती पुन्हा सुरू झाली, म्हणून या आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी आपण मुद्दाम येथे आल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी शेतकरी–शेतमजूर पंचायतीचे श्री. बा. न. राजहंस यांनी या चळवळीला प्रस्थापितांचा, मोठ्या बागायतदारांचा कसा विरोध होईल व त्याला कसे एकजुटीने तोंड दिले पाहिजे हे विस्ताराने सांगितले. सरकारी खर्चाने जिथे पाण्याचा साठा होतो तिथे बारमाही पिकाला पाणी मिळणार नाही, हे तत्त्व मान्य व्हावे यासाठी आपण पूर्वीपासून प्रयत्न करीत आहोत असेही त्यांनी सांगितले. शेवटी पंचायतीच्या आंदोलनास आपल्या संघटनेचाही पाठिंबा असल्याचे सांगून त्यांनी आपले प्रदीर्घ भाषण संपविले.

पाणी पंचायतीचे सूत्रधार श्री. विलासराव साळुंके यांनी मेळाव्याचे संयोजन करीत असताना काही प्रसंगोपात्त स्पष्टीकरणे केली; परंतु राजकारणी मंडळींची भाषणे लांबल्याने त्यांना, तसेच गावोगावहून आलेल्या अनेक सभासद शेतकऱ्यांना भाषण करणे शक्य झाले नाही. पुढील वेळी मेळाव्याची आखणी आपण अधिक काळजीपूर्वक करू असे सांगून व आभार मानून श्री. पोपटराव खेसे यांनी मेळाव्याचा समारोप झाल्याचे जाहीर केले.

मेळावा कार्यकर्त्यांच्या मनाप्रमाणे झाला नाही; परंतु कार्यकर्ते नाउमेद झालेले नाहीत. आंदोलनाच्या पुढील कार्यक्रमांच्या आखणीसाठी ते जिद्दीने कामाला लागले आहेत. दुष्काळी भागातील कोरडवाहू शेतकऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी त्यांनी कंबर कसली आहे. पाणीपंचायतीचे आंदोलन केवळ मागण्या मांडीत नाही, तर प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी शेतकऱ्यांना आपली जबाबदारी उचलण्यासही भाग पाडीत आहे. त्या दृष्टीने हे आंदोलन अभिनव आहे. त्याचे सर्वांनी स्वागत करायला हवे.

—अनिल काळे

कथा

# मन पाखरू पाखरू

अर्जुन शिवरास भोसले

अंथरुणातनं उठलो-ना उठलो. तो आलीच आईची हाक,

'ये पोरा, आटप बाबा तुझं; पाखरानी बघ सारा जोंधळा चाटलाय !'

ओरडलोच मी तिच्यावर : 'दम की ग मग...' पुन्हा खालच्या आवाजात म्हणालो, 'उठल नाही तो तुझी घाई...' पुन्हा अजून खालच्या आवाजात म्हणालो, 'नाही तर मी नाही जात, जा...!'

पण एवढयात देवघरातनं हातावर गोपीचंदन उगाळीत आप्पा गप्पकन मधल्या चौकटीत उंबऱ्यावर येऊन गरजले,

'पण काय आहे रं ऽऽ? चागला उलटा गुरकतोयस की. फुर्मेल झालायस का ? पळतो का नाही रानात...'

मला काय माहीत आप्पा घरात आहेत ते. मला वाटलं मारुतीला पाणी घालायला गेलेत. आता कशी खोड मोडली, असंच आईला वाटायचं; पण मला विरमलेला बघून एकीकडं घेत म्हणाली, 'जा बाबा; कावतील आणखी. जा, मी तुला अंडयाची पोळी करून आणते. पाखरं राखीत राखीत पडघालच्या पटीतल्या हरभऱ्यावर ध्यान द्याव. लोकं वदंळतील. घाटा भरलाय. जा !'

गंमत म्हणजे हरभऱ्याची राखण, अडयाची पोळी असा विषय आईनं काढला आणि मला किती दिवस राहून गेलेला माझा जादूचा प्रयोग आठवला. आता मला हरभऱ्याकडं कधी जाईनसं झालं.

'दोन अंडयाची पोळी आण !' म्हणत निघालोच मी.

बाटलीत भूत बंदिस्त करणे. जादूचा प्रयोग.

चिंचोळया तोडाच्या बाटलीत अख्खे अंडे बसवणे.

सकाळच्या दहिवरात आब आलेल्या हरभऱ्याच्या झाडांवर फडके फिरवून ते भिजले की भाडयात पिळावे. अशा जमा केलेल्या हरभऱ्याच्या आंबीच्या पाण्यात रात्री अंडे भिजत घालून सकाळी काढताच ते बिलबिलीत होऊन दाबाल तसे दबेल. बाटलीच्या चिंचोळया तोडावर ठेवून दाबावे; सटकन आत जाईल. बाटलीत गोडया पाण्याने ते धुवावे; पुन्हा पहिल्यागत टणक होईल.

करावा का प्रयोग ? भाडं, फडक काय सहज मिळेल. प्रश्न अंडयाचा आहे. तर मागच्या एका अंडयाच्या प्रयोगाला घरातनं लाबवलं तस लाबवावं. उभं अंडं हत्तीच्या पायाखाली दिलं तरी फुटत नाही हा माझा मागचा प्रयोग. दुपारी घरात कुणी नव्हतं. उतरंडीच्या गाडग्यातनं हळूच अंडं घेतलं. उकिरडयावर आलो. उभं धरून फुटतय का बघायचं होतं. फुटलं तर मागमूस नको म्हणून उकिरडयात खड्डा केला. त्यात येईल अस दोन्ही तळहातात उभं अंडं धरून किती जोरात दाबलं. नव्हतच फुटत; पण सटकन आडवं झालं आणि पचदिशी फुटलं ! साऱ्या हातावर डील आणि बलक झाला होता आणि कुणी बघितलं तर काही विचारायला नको म्हणून मला फार भीती वाटत होती.

मिरच्याजवळच्या पाणखाल्या रानातल्या गार हरभऱ्याला आंब असली तर उद्या अडयाची जादू करायचीच म्हणल्यावर मी गडबडीनं निघालो; नाही तर रोज उठलं नाही तो रान आणि पाखरं—हे काय !

पाखरांना काय हो, आपल्यासारख उठून झाडघाला जाऊन येणं, दात घासणं, तोड धुणं, चहापाणी असली सकाळची काम असतात का? तोडाला तोड दिसायला लागलं ना लागलं तोच चिवचिवाट करीत उठावं किंवा ध्यान झालं की चिटिक्किनी बाटेल तिथ शी करावी. मग अगदी माणसाच्या डोक्यावर विष्ठा पडली तरी काय फिकीर ?

□

पांथळात लक्ष्मीआईच्या पटीत आमची ज्वारी आहे. दाणे चागले चिक भरून कणसं भंडी व्हायला आलेली. त्या पटीजवळच पडीक रान आहे. तिथल्या पडक्या घरात रानात सीताफळ-घाणेरीचं दाट गचपण आहे. त्यात सारी चिमण्यांची कोटीच. जवळ आमचीच एकटी ज्वारी. तांबडं फुटून उजाडतय ना उजाडतय तोच चिवचिवाट—कलकाट करीत हे थवेच्या थवे आमच्याच ज्वारीवर. बिचाऱ्या या एकटयाच मालकाची ज्वारी कशी फस्त करावी असं काही त्याना सुचत नाही. त्यांना एकढंच सुचायचं की पिकावर बसल्यावर राखणदारानं हाऽऽ करून धुडकवलं तर भिर्रकन खाली पिकात उतरावं; आणि त्याचं तोंड फिरलं की पुन्हा हळूच जवळच्या ताटावर चढावं; पण ताटावर बसून गप दाणे टिपायच्या ऐवजी त्या चिवचिव का करतात ? या चिवचिवाटानं राखणदाराच ध्यान आपल्याकडं जाईल हे का त्याना कळू नये ? आपण हाऽऽ करून माळघावरनं गोफण फिरवली, डब्याचा आवाज केला तर लाब उडून न जाता तिथच पिकात उतरून आपल तोड फिरलं की पुन्हा हळूच ताटावर चढायचं त्याना कळतंय; पण चिवचिवाट करू नये हे नाही कळत सारा चिवचिवाटच! इकडं हाऽऽ केलं तर तिकडं बसल्या आणि तिकडं ओरडलं तर इकडं बसल्या ! ओरडून, डबा बडवून कितीही गोंधळ घाला, दाद देत नाहीत. गोफणीलाही जुमानीत नाहीत. गोफणीत घालून मारायला रानातली कितीही ढेकळं नेऊन माळघावर ठेवली तरी रोज संपायचीच. माळघावरनं उतरून हा—हूं करीत ज्वारीतनं फिरायचा कंटाळा येऊन जातो. माणूस ना काणूस, एकटच भटकाव. शजारच्या पटीत बापूची ज्वारी असली म्हणजे मजा असते, तर त्यानी विवड बदलला. नाही तर त्यांच्या ज्वारीतल्या माळघावरनं तानाजी 'लाडे लाडे हाऽऽ आडघालच सोडून पडघालचं खाऽऽ' असं ओरडला की आपण इकडनं 'भैय्या भैय्या हाऽऽ— आडघालचं सोडून पडघालचं खाऽऽ' असं ओरडायला काय मजा यायची ! सोबतही व्हायची बाता मारायला !

या दिवाळीच्या दिवसात तर जिजी, सरूआका, गोदाआका असं वहिणींपैकी कुणीकुणी आणि त्याची मुलं घरी असतात. नोकरीवरनं रजा काढून दादाही आलेले असतात. घरात कपडा-लत्ता, खाण-पिणं असं काहीतरी विशेष विशेष असतं; पण आपण उठलो ना उठलो तो आईच हे असं सुरूच, 'ये पोरा, आटप

बाबा...' बहिणीची मुलं, ही घरची मगळी घरीच, आणि आपण मात्र एकटे 'रानात बराबरा करायला. हे काय ? जरा दाद नाही दिली की, आई लाडू-कानवल्याची लालुच देईल. तरीही मान मोडून नाही म्हटल्यावर करून करून काय करील, शिव्या देईल तरी त्या भाच्यादेखत तिनं मला शिव्या दिलेल्या नाही आवडत. इतके का आपण पोरकट आहोत ? पण आई एकटीच घरात असल्यावर उशीरपतवर रेगाळता येतं. चार दिवसच रजेवर आल्यानं दादाही नाही मला बोलत; पण माझी बाजू घेऊन, राहू द्या त्याला आजच्या दिवस घरी, अस कुणी म्हणत नाही. आप्पा घरात असल्यावर तर काय उभे वारेच ! छो म्हणलं की कान उभे हवेत नाही तर मारच. गप आपली खाली मान घालून रानाची वाट धरायची. पाखरानी ज्वारी किती ओरबाडलीय काय करायचंय मला ? उजाडलं नाही तो रोज मला रानात हाकलून आपण घरी बसता त्याचं काय ? कधी एकदा जेवणवेळ होतेय नि परत फिरतोय असं होतं मला ! मग मी काही कमी नाही; लवकरच परत फिरतो. वाटेत अध्येमध्येच खेळत बसतो. आई म्हणते, एवढ्या येरवाळी पोरगं राखणेला जातंय तरी पाखरानी जोंधळ्याच्या पिशा पिशा केल्या... बऱ्या केल्या ! ...

¤

अड्याची पोळी– हरभऱ्याची आब–जादूचा प्रयोग आणि अशी काही तरी मनात फुणफुण करीत ठप्पकन ज्वारीजवळ कसा आलो कळलंच नाही. लक्ष्मीआईच्या पटीत ज्वारी. मध्ये गावधरणाचा पाट आणि शेड्याकडच्या पटीत पाटाला लागून गुंठा-दोन गुंठे मिरच्या. मिरच्याभोवती कडवळाचा ताटवा. ताटव्याला वेढलेली दाट जंजाळ पावट्याची हिरवीगार फुलातली जाळी. पलीकडं मिरचीला लागून पाणखात्या रानात गार-हिरवा हरभरा होता; पण बाकीच्याला घाटे लागून भरून ताबूस जून पडत चाललेला. पाणखातं रानही माजलेलं कुठली आब, जादूचा प्रयोग कोकलला की !

विरमल्या मनानं माळ्यावर आलो. हाऽहू केलं. कुठं आहेत पाखरं ? कणसं भेंडी झालीयत. आता नाहीत खात पाखरं. भरलेला हवार हरभरा वघून माळ्यावरन उतरून, पाट ओलांडून त्या रानात आलो चार डहाळे, चार तियले– तुटक तुटक अंतरान डहाळे उपटले. आपण एकजागी उपटला तर चोरानं नेलेल्याचा माग लागत नाही. पाटाच्या पाण्यात खळखळून हरभरा धुतला. मिरच्यांच्या उगवतीला बांधाजवळ कडवळाच्या ताटव्या गुफलेली पावट्याची दाट जाळी सुटेल तेवढी काढून खाली अथरली आणि गऊगार जाळीवर पडलो. घाटा घाटा डाचलीत खात होतो बराच वेळ पडलो होतो. मिरच्याच्या पटीला लागून मावळतीकडं रखमावहिनीचं रान. आमच्या मिरच्याला लागून तिच्या मिरच्या. हरभऱ्याला लागून तिची ज्वारी. तिच्या ज्वारीतल्या मोगणाचा हरभरा तर टच्च भरलेल्या हरभऱ्यानं लवकंडलाय. जरा वेळानं खसफसलं म्हणून पावट्याच्या जाळीच्या फटीतनं बघितलं. रखमावयनी होती. काही तरी तोडीत-खुडीत असेल.

जरा वेळानं काय झालं, जाळीच्या फटीतनं, डोळ्याच्या कडेतन मला रखमावहिनी आमच्या मिरच्यात आलेली दिसली. मी हळूच त्या कुशीवर वळलो. मी तिला दिसतच नव्हतो. बाकी कुणी चिटपाखरू जवळ नव्हतं. रखमावहिनी आमच्या मिरच्यातनं अवतीभवती भिरीभिरी बघीत होती. मी चित्रागत ध्यान देऊन होतो मला छबूआकाचं ध्यान झालं एकदा ती आरशापुढं वेणीफणी करीत होती. मान वाकडी करून, जीभ काढून, ओठ वेंगाडून, दात विचकून, बोटानं नाक वर धरून असं करून ती आपली बघतेय आरशात. आपल्याच नादात. तशीच ही रखमावहिनी !

गेली आमच्या हरभऱ्यात. नजर भिरभिरतच. मी आपला बघतोय; पण तिच्या मनी कुणी नाही बघीत. बकाबका मुडगा दोन मुडगे हरभरा उपटला पुन्हा भिरोभिरी बघीत आमच्या मिरच्यात आली. आता ती तिच्या मिरच्यात पाय ठेवायची तोच मी म्हणलं, 'काय हो वहिनी...'

रखमावहिनी वीज हालल्यागत हालली. काय विचकली. घामच फुटला असेल ! आधी मी दिसलोच नव्हतो. मी उठून बसलो. जोडा तोडात बसावा तशी माझ्याकडं बघीत होती. तिला काय करावं सुचेचना. मग काय मनात आलं. डहाळे तिथच खाली टाकून माझ्याकडं आली. वाटलं, आता काय म्हणील ?

आली आणि लागली पाय धरायला, 'भावजी, तुमच्या पाया पडते. जळलं माझं राडंच हात काहीही करा. मला जोड्यानं मारा. काऽऽय पण करा; पण तेवढं बघा आमच्या घरी काही सांगू नका. काय म्हणाल ते ऐकते !'

एवढी मोठी रखमावहिनी माझ्यापुढं बसून थरथर कापत होती. तिला घाम फुटला होता. डोळ्यात पाणी आलं होतं. मी एवढासा पोरगा, मला जोड्यानं मारा काय म्हणतेय, पाया काय पडतेय, काकुळतीला काय येतेय. मला उगीच चोरल्यागत झालं. जावा म्हणलं, नाही सागीत. गेली, पण घाबरीघाबरीच ! मी न सांगता राहीन का असं तिला वाटत असावं.

पण मी असलं कधी बघितलंही नव्हतं आणि ऐकलंही नव्हतं. म्हणून मी चित्रासारखा बघीतच होतो. आई म्हणते रखमावहिनीच्यात सावकरकी आहे. रखमावहिनीच्या जोंधळ्यात किती चांगला हरभरा असून आमच्यातला इतका उपटला ? स्वत:चा असूनही मी जर एवढा हरभरा उपटला असता आणि आईनं बघितल असतं तर पोटचं पोर न म्हणता कुत्र्यागत चेचलं असतं !

डोळ्यावर हात देऊन मी पुन्हा पावट्याच्या जाळीत पडून राहिलो मला अगदी कमाल वाटत होती मी हसलो : हळूऽऽच निघालीय. किती चपतचपत. मग काय ताटावरल्या चिमण्यागत गोंधळ घालीत जाईल का ती ? चिमण्यांना काय चोच आहे फक्त. रखमावहिनीगत सावकरकी नाही. आपलं असून दुसऱ्याचं घ्यावं ? तिला आधी वाटलं असेल कुणी नाही बघीत इथं मी तर बघतोय पाप अंधारात केलं तरी त्याचा देव साक्षी. तिला नसेल कधी वाटत असा देव साक्षी राहील किंवा वाटत असेल की . वाटायला काय आत्ता मला असं वाटेल तर मग तसं; पण तसं काही रखमावहिनीला वाटेल त्या वेळी तिला हे ध्यानात येईल का ? की आपण आपला असताना दुसऱ्याचा हरभरा चोरायला गुपित घाला घालीत होतो...माणसाला काहीही वाटेल कारण वरीच माणसं चोरी करतात आणि सगळीच माणसं देवपूजाही करतात अरे ? आपणही अंडं चोरलंच की; पण ते काही दुसऱ्याचं नाही. आमच्याच घरचं; पण मी अडं घेऊन घरातनं येताना कुणी बघितलं असतं तर म्हणलं असतं, चोरून अंडी विकायला का ? त्याला काय माझा जादूचा प्रयोग कळणार आहे ?...

'चागली पाखरं राखतोयस ना ?' आई जवळ उभी राहून म्हणाली, तसा मी केवढ्यांदा लट्टदिशी हललो. कधी जवळ आली कळलंच नाही. काळजाचं पाणी झालं.

तिच्याकडं बघितलं, डोक्यावर भाकरी होती. अंड्याच्या पोळ्या करून घेऊन आली होती. तिला मला रागवायचच असेल; पण मी असा काही हललो की, ती खळखळून हसली. □

# योद्धा शेतकरी

**लेखांक चौथा**

लेखन आणि संकलन

**विजय परुळकर**

१२ नोव्हेंबरला शरद जोशीनी आदेश दिला– तीन दिवस अडकून पडलेल्या गाड्या सोडून द्या ! पोलिसाना अडथळे दूर करून आग्रारोड मोकळा करून द्या ! त्यानंतर पुन्हा शांतपणे रस्ता बद आदोलन सुरू करा !

अधिकाऱ्यानी शरद जोशीना हमी दिली होती की, एकदा हा तुबलेला ट्रॅफिक सोडण्यासाठी आदोलकानी सहकार्य दिल्यानंतर पुन्हा जर त्यानी रस्ता बंद केला तर सत्याग्रहीना शातपणे अटक करण्यात येईल, बळाचा वापर– लाठीहल्ला वगैरे करण्यात येणार नाही !

बारा नोव्हेंबरला संध्याकाळी सात–साडेसातपासून आग्रारोडवर अडकून पडलेल्या हजारो ट्रक्स्‌ची इंजिनं पुन्हा घरघरू लागली– एका मागोमाग गाड्या सुटल्या– पहाटे दोन–अडीचपर्यंत बहुतेक सगळ्या ट्रक्स् मार्गस्थ झाल्या आणि आग्रारोड मोकळा आणि सुनासुना झाला !

१३ नोव्हेंबरपासून शेतकरी लगेचच पुन्हा रस्ता बंद करणार होते. पहाटे सहा वाजता मी शरद जोशीच्या बरोबर पिंपळगाव-बसवंतहून निघालो, सोग्रसमार्गे आम्ही मंगरूळपीर फाट्याच्या दिशेन चाललो होतो. फाट्याच्या अर्धा-पाऊण किलोमीटर अलीकडेच एक भयानक दृश्य नजरेस पडलं–

एस्. आर. पीकडून काठ्यानी झोडपले गेलेले, बुटानी तुडविले गेलेले चार-पाच हजार शेतकरी गुरांप्रमाणे ओरडत माळोरान धावत सुटले होते. मी युद्धाचे अनेक प्रसग पाहिले आहेत; पण असा अमानुष प्रकार कधीच पाहिला नाही. हा तर उघड उघड अत्याचार होता. युद्धामध्ये दोन्ही बाजूच्या सैन्याहाती शस्त्र असतं, इथं तर सगळा एकतर्फी मामला होता ! नि:शस्त्र किसान विरुद्ध शस्त्रधारी पोलीस ! मुकाट्यानं मार खाणं आणि असह्य झालं की गुराढोरांप्रमाणे ओरडत जीव घेऊन सैरावेरा पळणं ह्यापलीकडं शेतकरी दुसरं काय करणार !

सोग्रसच्या बाजूनं आमची जीप येताना पाहून माळोरान धावणारे शेतकरी क्षणभर थाबले. जीपमधून शरद जोशी उतरताच त्याची निळी पॅंट आणि पाढरा बुशशर्ट हा ओळखीचा पोषाख नजरेस पडताच क्षणार्धात सर्व शेतकऱ्याच्यात नवचैतन्य पसरलं. ह्या एकतर्फी चालू असलेल्या निर्घृण हल्ल्याच्या समरप्रसंगी एकाएकी आपल्या सेनापतीला पाहून सारा किसान वेदना विसरून गर्जून उठला !

शरद जोशी जीपच्या बॉनेटवर चढून उभे राहिले– पहातापहाता माळरानावर पाच हजार शेतकरी घोषणा देत जमले शरद जोशीनी त्याना शात रहाण्याची सूचना दिली सारा समुदाय एकदम सावधान झाला आणि कानात प्राण ओतून आपल्या नेत्याचे शब्द ऐकू लागला. लाठ्याकाठ्यानी बडविली गेलेली, काही क्षणापूर्वीच गुराढोराप्रमाणं ओरडणारी, नेत्याला पाहून भान हरपून घोषणा देणारी पाच हजार माणसं क्षणार्धात शात झालेली पाहून मी विस्मयचकित झालो. असं विलक्षण नाट्य मी ह्यापूर्वी पाहिलं नव्हतं किंवा अनुभवलं नव्हतं जीपच्या बॉनेटवर उभं राहून शरद जोशी म्हणत होते–

‘ इथं लाठीहल्ल्यामध्ये जखमी झालेली माणसं आहेत– आम्हाला त्याच्याजवळ प्रथम ताबडतोब गेलं पाहिजे– मंगरूळफाट्यावर काय परिस्थिती आहे ते पाहिल पाहिजे– तुम्ही सर्व मंडळी इथंच शातपणे

बसून रहा ! आम्ही मंगरूळफाट्याला जाऊन परत येतो– तिथं कुणी जखमी पडले असतील तर त्याना मदत केली पाहिजे. तुम्ही मैदानात शांत बसून रहा !'

आमची जीप मंगरूळपीरफाट्यावर पोहचली तेव्हा एक अतिशय स्मार्ट दिसणारा तरुण सब्इन्स्पेक्टर काहीसा गुर्मीतच समोर आला. मिश्या पिळतच त्यानं प्रश्न केला, ' तुम्ही लोक कोण ? इथ तुमचं काम काय ?'

' मी शरद जोशी '– जीपमधून उतरत शेतकरी संघटनेच्या नेत्यानं स्वत:ची ओळख करून दिली तरुण सब्इन्स्पेक्टरन चटकन् हात पुढे करून त्याच्याशी हस्तादोलन केलं. लाठीहल्ल्याविषयी चर्चा करायला त्यानं स्पष्ट नकार दिला. त्याचं बोलणं कडक वाटत असलं तरी विसंगत असं तो काही बोलत नव्हता. प्रश्नांना जेव्हढ्यास तेवढी आणि मोजक्या शब्दात तो उत्तरे देत होता· प्रथमदर्शनी उर्मट वाटणारा हा रुबाबदार तरुण इन्स्पेक्टर अतिशय हुषार आहे एवढंच नव्हे तर ' नेक ' आहे ह्याची जाणीव झाली. शरद जोशीनी मंगरूळफाट्यावर सर्वत्र फिरून पहाणी केली, काठ्या परजून तयार असलेले एस्. आर. पी. कुतूहलानं शेतकरी संघटनेच्या नेत्याकडे पहात होते. त्याची नजर वळताच मान खाली घालत होते एक दुय्यम दर्जाचा अधिकारी जवळ येऊन शरद जोशीबरोबर काही तरी अघळपघळ बोलण्याचा प्रयत्न करू लागताच तरुण इन्स्पेक्टरनं त्याला झापला आणि ' ड्युटीवर ' असल्याची जाणीव करून दिली. पहाणी आटोपून शरद जोशी जीपमध्ये बसले तेव्हा इन्स्पेक्टरनं त्याच्याशी पुन्हा हस्तादोलन केलं आणि किंचित हसत ' बेस्ट लक् ' असा इशारा केला. सोग्रस रस्त्यावर पाच हजार शेतकरी शरद जोशीची वाट पहात होते, त्यांच्यामधोमध जीप उभी करून, बॉनेटवर चढून शरद जोशी बोलू लागले–

' एक गोष्ट नक्की की मंगरूळपीरफाट्यावर आत्ता कुणीही जखमी पडलेला नाही. पलीकडच्या भागामध्ये दोघाजणांना लागलेलं होतं– त्यांना ज्यांनी चांदवडच्या हॉस्पिटलमध्ये पोहचवलं ती मंडळी आमच्याबरोबर इथं आली आहेत– इतर दोघाना आम्ही पोलिसांतर्फे चादवडला चवकशी करायला पाठवलं आहे.

' आता आपला इथून पुढचा कार्यक्रम मी तुम्हाला सागतो, तो लक्षपूर्वक ऐका ! आपण तीन दिवस हा लढा थंडीत, उन्हात, पावसात चालवला आहे. शहरामध्ये जेव्हा संप, बंद किंवा आंदोलन होतं तेव्हा तिथं पोलीस माणसाशी जसं वागावं तसं वागतात. शेतकऱ्याच्या आदोलनाबाबतीत मात्र शेतकरी म्हणजे गुरं आहेत असं समजून त्यांचं नुसतं बडवणं चाललं आहे. अशा रीतीन मार खाणं आपल्याला आता शक्य नाही. इथून पुढं आपण असा फुकटचा मार खायचा नाही ! आपल्याला आता लढण्याचा दुसरा एखादा मार्ग शोधून काढला पाहिजे. तो मार्ग आम्ही उद्या जाहीर करू !

' सगळ्यानी आता आपली एक दिवसाची सुट्टी झाली अस समजून आपआपल्या घरी जायचं आहे. इथून पुढं गनिमी सत्याग्रहाचा आपल्याला वापर करावा लागणार आहे. आज आपल्याला असा मार खाऊन आंदोलन चालू ठेवणं सोयिस्कर नाही म्हणून आंदोलन थोडं मागं घ्यायचं आहे. ही पोलीसमडळी तरी किती दिवस बसून रहाणार आहेत इथं ?'

' आज संपूर्ण विश्रांतीचा दिवस आहे असं सगळेजण समजा ! तीन दिवस आपल्याला खूप कष्ट पडले आहेत. विश्रांती घेऊन आपण सगळेच पुन्हा ताजेतवाने होऊ या. तुम्ही सगळे आज पोलिसांच्या लाठ्या खाऊन शेतकरी सघटनेचे खरे सैनिक झाला आहात!

' इतके दिवस मी लोकाना सागत होतो की सरकार तुम्हाला काय वाटेल ते देईल; धरणं बांधून देईल– पन्नास कोटीची कर्जमाफी देईल– पण शेतमालाचे भाव बांधून देणार नाही. तेव्हा काही जणांना ते खरं वाटायचं नाही. शेतमालाच्या भावाचं महत्त्व सरकारला किती आहे हे तुम्हाला आता लाठ्या खाल्ल्यानतर पटलं असणार ! सरकार म्हणतं आम्ही तुम्हाला दुसरं काहीही देऊ ; पण शेतमालाचा भाव मागितलात तर मात्र तुमच्या पाठीत बडगा घालू ! वेळ पडल्यास तुमच्यावर गोळ्या चालवू !

' आज इथं जो प्रकार घडला त्याचप्रमाणे जागोजाग पोलिसानी काहीही विचार न करता अत्याचार केला आहे. निफाड, लासलगाव, खेरवाडी या स्टेशनांवर असाच प्रकार घडला आहे. शेतकरी म्हणजे दोन पायाचं जनावर अशी वागणूक सरकारकडून दिली जाते त्याचा आज तुम्हाला पुरावा मिळाला !

' शेतकरी सघटनेचं आंदोलन चालू असताना मी माझ्या सैन्याला असा फुकटचा मार खाऊ देणार नाही ! आज तुमच्या मनात जो संताप उफाळलेला आहे, जी प्रचंड चीड निर्माण झाली आहे, ते सर्व आजपासून मनात साठवून ठेवायचं आणि पुढं जी सघटनेची कामं व्हायची आहेत, त्या वेळी ह्या साठवलेल्या संतापाची आठवण ठेवायची.

' आज आपल्या गावी परतल्यावर तुम्ही इतराशी बोलणार आहातच. पोलिसांनी तुम्हाला कशा प्रकारची वागणूक दिली हे तुम्ही सांगणार आहातच. हे पोलीस जणू आपल्या देशातील नव्हेतच अशा प्रकारे वागतात. काही कारण नसताना बडवतात, हे तुम्ही कधीच विसरणार नाही !

' काल ह्या पोलिसाच्या अधिकाऱ्यांसमक्ष मी शेतकरी संघटनेच्या सत्याग्रहीना आश्वासन दिलं होतं की, साठलेल्या गाड्या सोडल्यानतर तुम्ही पुन्हा रस्त्यावर आंदोलनासाठी बसलात तर तुम्हाला अटक करण्यात येईल. लाठीचार्ज होणार नाही, त्याप्रमाणे तुम्ही तीन दिवस अडकलेल्या गाड्या सोडून दिल्यात; पण पोलिसानी मात्र आपला शब्द न पाळता लगेचच तुमच्यावर लाठीहल्ला केला; ह्याबद्दल तुम्हाला चीड आली आहे, सताप आला आहे हे मी जाणतो, पण हा संताप कुठं तरी एक दिवसापुरता वापरून त्या दिवसासाठी विजय मिळविण्यात फायदा नाही हे ध्यानात ठेवा ! हा सताप मनात साठवून प्रत्येकान सघटनेच्या कामासाठी प्रचाराला लागायचं आहे !'

' दहा नोव्हेंबरला–आदोलनाच्या पहिल्या दिवशी ह्या मंगरूळपीरफाट्यावर वीज हजार शेतकरी रस्ता अडवून बसले होते. तेव्हा लाठी चालवायची हिम्मत पोलिसानी दाखविली नाही; पण आज फक्त चार-पाच हजार माणसं होती म्हणून त्यानी लाठीहल्ला केला. इतर ठिकाणी सुद्धा जिथे दोन-तीनशे शेतकरी रस्ता अडवून होते त्याना एस्आरपीनं झोडपून काढलं आहे. आपली सख्या कमी असली की त्याना ' ताकद' दाखविण्याचा मोह होतो. पुढच्या खेपेला आप-

त्याला ह्याच फाट्यावर, जरूर पडल्यास, पन्नास हजार माणसं उभी करता आली पाहिजेत! मग बघू कसा लाठीहल्ला होतो ते !

'मी सांगितलं ते नीट ध्यानात ठेवा. आजची चीड मनात साठवून ठेवा. गावोगाव जाऊन प्रचार करा आणि पुढील आदेशाची वाट पहा !'

पाच हजार शेतकरी आपल्या सेनापतीला अभिवादन करून उठले. शारीरिक वेदना विसरून, मनामध्ये उदंड आत्मविश्वास घेऊन आपल्या गावच्या दिशेनं चालू लागले. एस्आरपीनं आपल्याला गुरासारखं झोडपलं तरी अखेर आपलीच जीत होणार असा विश्वास प्रत्येकाच्या चेहऱ्यावर झळकत होता.

मंगरूळपीरफाट्याजवळ, सोंग्रसरस्त्यावर घडलेला हा प्रसंग माझ्या दृष्टीनं अविस्मरणीय आहे. शेतकरी आंदोलनातील हा एक महत्त्वपूर्ण प्रसंग आहे शरद जोशींचं छोटसं भाषण शेतकरी आंदोलनाच्या रणनीतीचा उत्कृष्ट नमुना म्हणून अभ्यासण्यासारख आहे. 'मार खाल्लेल्या' सैन्याचं आत्मिक बळ शरद जोशी टिकवू शकतात एव्हढंच नव्हे तर त्या बळाला हिंसकरूप येऊ न देता त्यातून प्रचंड अशी संघटित ताकद उभी करू शकतात; ह्या असामान्य नेतृत्वानं शेतकरी भारावून गेला नाही तरच नवल !

जीप सटाण्याच्या दिशेनं निघाली आणि मनात सहज विचार आला– आज ह्या प्रसंगी एखादा राजकीय पुढारी कसा वागला असता ? 'रक्ताचे सडे पडले तरी हरकत नाही, आम्ही आमच्या मागण्या (म्हणजे राजकीय स्वार्थ) पुऱ्या होईपर्यंत लढणारच ! अशीच भूमिका त्यांनी घेतली असती का ?– शरद जोशींना आंदोलन चालवता येत नाही असा आरोप करणारी राजकारणी मंडळी ह्या प्रसंगी कशी वागली असती ?–महाराष्ट्रात सर्व देशभरच आता राजकारणी लोक आपआपल्या शेतकरी संघटना स्थापून (शेतकऱ्यांच्या नव्हे), शेतमालाच्या भावाविषयी आंदोलने उभी करणार अशी लक्षणं स्पष्टपणे दिसू लागली आहेत. ह्या राजकारणी मंडळीच्या शेतकरी आंदोलनातील आणि शेतकरी संघटनेचा प्रणेता शरद जोशी ह्यांच्या राजकारणविरहित शेतकरी आंदोलनातील फरक शेतकऱ्यांनाच जाणवू लागेल !

तीस वर्षांच्या सवयीमुळे काही शेतकरी आपल्या परिसरातील राजकीय पुढाऱ्याच्या भुलावणीला बळी पडून, त्या पुढाऱ्याच्या शेतकरी आंदोलनात काही काळ सामील देखील होतील, पण इथून पुढं बहुसंख्य शेतकरी शरद जोशींनी उभ्या केलेल्या शेतकरी संघटनेच्या दिशेने आकर्षित होणार ह्यात संशय नाही. शरद जोशी ही आता व्यक्ती राहिली नसून तो आता एक विचार झाला आहे–शेतकऱ्याच्या जिव्हाळ्याचा विचार !

सटाण्याला जाण्यापूर्वी सोंग्रसला जायचं असं ठरलं आणि गाडी त्या दिशेनं निघाली. सोंग्रसच्या श्री. भास्करराव गागुर्डेबरोबर शरद जोशी काही चर्चा करीत होते. मी आजूबाजूला फिरून मुलाखती टेप करत होतो बारा वर्षांचा एक मुलगा सांगत होता–

'मी झोपलो होतो इतक्यात दंगा सुरू झाला. सरदारजी ड्रायव्हर एका बाजूनं लाठ्याकाठ्या घेऊन आले. मला भीती वाटली की हे आता आमच्या घराला आग लावणार ! सरदारजी लोक बेधडकपणे अन्याय करू लागले. काही पिस्तुल घेऊन आले, तलवारी घेऊन आले. एसआरपीचे लोक आले, सरदारजीच्या तलवारी, पिस्तुल त्यांनी पाहिलं–पण त्यांना एक शब्द देखील ते बोलले नाहीत. ड्रायव्हर आमच्या घरात काही घुसले नाही– पण दरवाजावर त्यांनी भाले मारले, खिडक्या मोडून टाकल्या. इतक्यात डीवायएसपीची गाडी आली. ट्रकड्रायव्हर त्याच्या भोवती जमले. गाववाले आम्हाला मारतात असं म्हणू लागले. ट्रकवाल्याच्या हातात तलवारी बघून सुद्धा डीवायएसपी त्यांना काही बोलले नाहीत–ते तसेच निघून गेले. त्यानंतर ट्रकड्रायव्हर्सनी गावात घुसून धुमाकुळ घातला. गावातील स्त्रिया मळ्यामध्ये पळून गेल्या !'

पंचविशीची एक स्त्री सांगू लागली– 'आमच्या घरात रस्त्यावरनं पळणारी दोन माणस आसऱ्याला आली. त्यांच्या पाठोपाठ चारपाच पोलीस घरात घुसले आणि त्यांना मारायला सुरुवात केली. मारीत मारीत त्यांनी लोकांना बाहेर काढलं. त्यात आमच्या एका माणसाला पण काढलं. तो लागला तिथून ओरडायला–सीख ड्रायव्हरांनी सकाळी लई दंगा सुरू केला– ते तलवारी घेऊन कुणाच्याही अंगावर जायला लागले. आमच्या लोकांनी चिडून मग दगडफेक सुरू केली.'

ट्रकड्रायव्हरांना चिथावणी देऊन त्यांच्याशी संगनमत करून पोलीस आणि एसआरपीन केलेल्या अत्याचाराच्या कहाण्या ऐकता ऐकता एका सत्तरी उलटलेल्या वृद्धेकडं माझं लक्ष गेलं. मी त्यांना प्रश्न विचारले. तेव्हा आजीबाई म्हणाल्या–

'पहाटे चार-पाचची वेळ असंल–आम्ही घरात झोपलो हुतो. ते गाडीतून उतरून घरात घुसले तसा लाठीमार सुरू. फार मारलं– फार मारलं. लाथा मारून ते घरातून बाहेर पडले. पुन्हा सकाळी आठच्या सुमाराला आले– देवरेगावचा दामू मोरे म्हणून हाये– त्याला खूप मारलं. शिखाईनं (शीख) चालवली दंगल. आम्ही दार लावून बसलो तरी काय विचारू नका– दारं काय, खिडक्या काय, गज काय– छपरावरची कौलं काही ठेवलं नाही !'

'तुम्हाला सांगत्ये आमचे रांजण होते पाण्याचे बाहेर– ते फोडून फारच नुकसान केलं ! ह्या गाडीच्या शिखाई ड्रायव्हरांनी !'

'पार अगदी घरातच घुसले– तलवारच काढली त्यांनी. बाहेर अप्पा आला बाजरीची गाडी घेऊन – त्याच्या अंगावर धावले. मी म्हटलं, 'अरे, तो आमचा मानूस हाये– बाजरी वहातो– असं का करतात ?' मग त्ये म्हणाले– 'तुमचा माणूस आहे तर आत घ्या– दार लावून बसा– 'दरवाजा रोको' अस काय तरी म्हणाले.

'ह्ये पोर–माझा नातू, स.रख रडायच. बाहेर आमची बाजरीची 'सुडी' होती. शिखाईन त्याला काडी लावली; पण एका माणसानं लगेच विझवली. काडी लावायचं काम शिखाईनं केल – पोलिसांनी नाही. लगेच त्या माणसानं विझवलं म्हणून बरं– नाही तर मगळंच पेटून गेलं असतं !

## शरद जोशी हा आता एक 'विचार' झाला आहे...

'आजूबाजूला नुसती दंगल सुरू झाली. रस्ता अडवून बसलेले बरेच लोक पोलिसांनी पकडून नेले. लई दंगा झाला. बाकीच्यांना मग मारीत सुटले. दाणादाण उडविली. मारायचे तवा माणसं खाली पडायची– मी समक्ष डोळ्यानी पाहिलं– माणसं सगळीकडे पळत सुटायची आन् हृघे मारीत सुटायचे. आमचं टाबाट्याचं (टॉमेटो) रोप सगळं तुडवलं– काय बोलायला जागाच राहिली नाही आम्हाला तर.

'राती झोप येईना. तहान लागली– घसा अगदी कोरडा होऊन गेला. एव्हढी एव्हढी भाकर खायला होईना माझ्याच्यानं. मग दाराच्या कड्या-कोयंडे नीट केले– दाराला चुका ठोकून पक्कं बंद केलं. तरी झोप येईना. हृघे बघा अजून माझ्या काळजाचं कापरं गेलं नाही!'

सोग्रसच्या परिसरात बारा नोव्हेंबरच्या पहाटे आणि सकाळी आठच्या सुमारास घडलेल्या ह्या प्रसगाच्या मुलाखती मी नऊ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा-अकराच्या सुमारास रेकॉर्ड केल्या. मंगरूळपीरफाट्यावर रस्ताबंदआदोलनात सहभागी झालेला एक तरुण पोलिसांच्या लाठ्या खाऊन सुजलेला पाय शेकत बसला होता. कुणी तरी मोटारसायकलवरून त्याला घरी आणून पोहचवलं होतं. शेतकरी संघटनेची वर्गणी 'चुकती' केलेला हा तरुण अंगावर जागोजागी असलेल्या 'पावती'च्या खुणा दाखवत म्हणाला–

'आम्ही दहा नोव्हेंबरपासून मंगरूळफाट्यावर शरद जोशींच्या आदेशानुसार 'रस्ता रोको' आंदोलनासाठी गेलो. आमच्या नेत्यानं सांगितल्याप्रमाणे हात बांधून रस्त्यावर बसायचं आणि शाततेनं आंदोलन पार पाडायचं असं आम्ही ठरवलं होतं. रस्त्यावर बसलेल्यांना अटक झाली की पुन्हा दुसरी माणसं शातपणे रस्त्यावर बसायची. असा आमचा कार्यक्रम सुरू झाला. सातत्यानं दोन दिवस असा कार्यक्रम चालू होता.'

'१२ तारखेच्या पहाटे सोग्रस आणि चांदवड अशा दोन्ही दिशांनी येऊन पहाटे साडेतीन-चार वाजता पोलिसानी रस्त्याच्या कडेला झोपलेल्या सत्याग्रहींना जबरदस्त मारहाण केली. माणसं झोपेतून घाबरून उठली– काहींची डोकी फुटली– सगळे सैरावैरा पळाले.

'दिवस उजाडल्यावर आम्ही पधरा-सोळाशे लोक एकत्र आलो. तिथल्या इन्स्पेक्टरला सांगितलं, आम्ही मारामाऱ्या करीत नाही, दगडफेक करीत नाही. असं असताना तुम्ही आमच्यावर अन्याय करता हे बरोबर नाही. आम्ही आदोलक आहोत, आम्हाला अटक करून तुम्ही जेलमध्ये पाठवा. त्या वेळी मग त्यानी एकवीस एस. टी. गाड्या मागवल्या, आम्हाला त्यात बसवलं आणि सकाळी साडेनऊ वाजता मंगरूळफाट्यावरून काढून चांदवड तहसील–कार्यालयात नेलं. रात्री साडेअकराला मनमाडहून मॅजिस्ट्रेट आले. त्यानी आम्हाला वैयक्तिक जामिनावर सोडलं. काही माणसं चादवडमध्येच थांबली. आम्ही परत मंगरूळफाट्यावरती आलो.

'शरद जोशीनी तुबलेला ट्रॅफिक सोडून देण्याचा आदेश दिला अशी वार्ता कानावर होती. रस्ता रोको आदोलन मात्र चालू रहाणार असदेखील कळल. मगरूळफाट्याला अडकलेल्या गाड्या सुटल्या हात्या. तेरा तारखेच्या पहाटे तुबलेल्या सगळ्या गाड्या निघून गेल्या आणि आग्रारोड मोकळा झाला.

'आम्ही आग्रारोडपासून सात-आठशे फुटावर लाबवर विश्राती घेत होतो. पाऊस पडत असल्यामुळे माणस आडोशानं झोपली होती. काही जण मराठी शाळेत जाऊन झोपले होते

'पहाटे चार वाजता एस आर. पी. नं पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली. लोकाना बेदम मारल. लोकाच्या खिशातील पैसे काढून घेतले. हातातील घड्याळं काढून घेतली. लाथानी, बुक्क्यानी मारलं. रस्त्यावर पडलेल्या लोकाना ठोकरीनं मारून दोन पाय धरून फरफटत नेलं– अशा अवस्थेत आम्ही मग पुन्हा पळालो आणि सोग्रसरस्त्यावर आलो. एस. आर. पी.चे लोक आमच्या मागे धावले. त्यानी आम्हाला दम दिला की, परत तुम्ही मंगरूळफाट्यावर आलात तर गोळ्या घालून मारून टाकू! आम्ही मैदानात बसून राहिलो. पुन्हा सात वाजता आम्ही रस्त्यावर जायचा प्रयत्न केला तेव्हा त्यानी आमच्यावर हल्ला करून झोडपायला सुरुवात केली. आम्हाला सांगितलं की, १४४ बंद करून कलेक्टरसायबानी आता कर्फ्यूऑर्डर काढली आहे. आम्ही आता तुम्हाला गोळ्या घालून मारू!'

ब्राह्मणगाव, सौदाण्याच्या परिसरात फिरत असताना शेतकरी संघटनेच्या एका कार्यकर्त्याची मी मुलाखत घेतली, तीदेखील विचारात घेण्यासारखी आहे. तो कार्यकर्ता सांगत होता–

'आम्ही अगदी शाततेनं आदोलन सुरू केलं सौदाण्याच्या लोकानी सहानुभूती आणि पाठिंबा दिला. पुलावरती सगळ्या ट्रक्स अडवल्या. त्या वेळी गावातील काही टारगट पोरानी काही ट्रकच्या चाकामधील हवा काढून इतरही नुकसान केलं. त्यांना आम्ही आवरायला पाहिजे होतं; पण तेव्हा आमच्या ते लक्षात आल नाही हेही तितकंच खरं. आरईची मंडळी, सौदाण्याची आणि आम्ही ब्राह्मणगावची मंडळी संध्याकाळी रस्त्यापासून लाब होतो. इतक्यात एस. आर. पी.च्या चार-पाच गाड्या आल्या. त्यांनी गावाला गराडा घातला आणि लोकाना हाणायला सुरुवात केली. एका बाळंतीण बाईलासुद्धा मारलं. पोलिसाचं बळ अपुरं पडत होतं म्हणून त्यानी ट्रकड्रायव्हराची मदत घेतली.

'प्रल्हाद पाटील कराड आमच्याकडे येऊन गेले. त्यानी सागितलं की, शांतपणे रस्त्यावर बसायचं, पोलीस आले की त्याना सागायचं आम्ही कायदेभंग करतोय. आम्हाला अटक करा. त्याच भावनेनं आम्ही बसलो होतो; पण अटक करायला पोलीस आलेच नाहीत.

'रात्री आम्ही झोपलो. दीड-दोनच्या सुमारास एस. आर. पी.नं ट्रकवाल्याचं सहाय्य घेऊन आम्हाला मारायला सुरुवात केली. ट्रकवाल्यानी तर आमचे कपडे पेटवले– 'सुड्या' जाळल्या, बैलाच्या शेपट्या कापल्या!

'मालेगावच्या एका प्रांताच्या दर्जाच्या अधिकाऱ्याने तर ठिणगी टाकण्याचा प्रयत्न केला. त्यानी ट्रकवाल्यांना बोलावून आमच्याशी झगडा करायला पाठवलं. टेहेऱ्यामध्येसुद्धा असाच प्रकार घडला. आम्ही एक निवेदन तयार करून त्या अधिकाऱ्याना दिलं की, 'तुम्ही जर ड्रायव्हराची गॅंग करून असले प्रकार करणार असाल तर ह्याची संपूर्ण जबाबदारी शासनावर आणि व्यक्तिगत अधिकाऱ्यावर राहील!'

ह्या सर्व मुलाखतींचा अभ्यास केला तर 'गय करणार नाही' किंवा 'वठणीवर आणले जाईल' म्हणजे काय ते नीट लक्षात येत. ◻

सोग्रस-फाटयावरील श्री गांगुर्डेबरोबर शरद जोशींची चर्चा संपली आणि आम्ही देवळे इथ गेलो. देवळयात जीप शिरताच 'शरद जोशी आले' हे शेतकऱ्यांच्या लक्षात आलं. मिनिटभरातच तीन–चार हजार लोक चौकामध्ये गोळा झाले. संपूर्ण नासिक जिल्ह्यात १४४ कलम लागू करणाऱ्यानी ह्या गोष्टीवर थोडा विचार करणं आवश्यक आहे असं मला वाटलं. हा शरद जोशी कुठंही गेला तरी काही क्षणातच दोन–तीन हजार माणसं– सटाणा-बागलाण-परिसरात तर दहा–पंधरा हजार माणसं ह्याच्या भोवती गोळा होतात. १४४ कलम पाळण्याची शरद जोशींची खूप इच्छा असली तरी त्याला ते पाळता येत नाही ही वस्तुस्थिती असताना त्याच्यामागे सतत 'तुम्ही कायदेभंग करता' असं तुणतुणं वाजविण्यात काही अर्थ आहे का ?

देवळयाच्या चौकातील हजारो शेतकऱ्यांच्या जमावाचं पहातापहाता सभेत रूपांतर झालं. शरद जोशी सांगत होते–

'दहा तारखेपासून आपण जे रस्ताबंद आंदोलन सुरू केलं त्याचा आज चौथा दिवस आहे. संपूर्ण नासिक जिल्ह्यात आग्रारोडवर आणि रेल्वेमार्गावर, ठिकठिकाणी, पाच–दहा आणि वीस वीस हजार लोकानी भाग घेतला. मंगरूळरपीरफाटयावर ज्या मोठया प्रमाणात शेतकरी 'रस्ताबंद' आंदोलनात उतरले त्याचा आकडा सांगणं-सुद्धा कठीण आहे. बागलाण आणि कळवण परिसरातील शेतकऱ्यांनी जे असामान्य धैर्य दाखवलं, संघटनेची शक्ती दाखवली, जो विश्वास दाखवला, त्या विश्वासाला मी पात्र ठरावं एवढीच माझी प्रार्थना आहे.

'ह्या आंदोलनामध्ये आपल्याला जे काही अनुभव आले ते पडताळून आणि तपासून पहाणं आवश्यक आहे.'

**'मी प्रत्येक सभेमध्ये एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, आज जरी आपण हे आंदोलन उसाच्या आणि कांद्याच्या भावासाठी करत असलो तरी ह्यापलीकडे– सगळ्या शेतकऱ्यांना संघटित करून, त्यांच्या सगळ्या शेतमालाला भाव मिळाला पाहिजे ही आपली मागणी आहे!'**

'सध्या आपल्याला उसाचा लढा देणं सोयिस्कर आहे म्हणून आपण हे दोन पदार्थ निवडले आहेत. कोरडवाहू भागातील शेतकऱ्यानी, हे फक्त उस कांदेवाल्याचच आंदोलन आहे, असा गैरसमज करून घेण्याचं मुळीच कारण नाही !

'मला सांगायला अभिमान वाटतो की ह्या आंदोलनामध्ये ऊस-कांद्याचे शेतकरी जितके सहभागी झाले तितकेच कोरडवाहू भागातील शेतकरीही मोठया प्रमाणावर सहभागी झाले. शेतकरी संघटनेचा हा मोठा विजय आहे !'

'आपण ह्यापूर्वी देखील राजकीय पक्षानी केलेली अनेक प्रश्नांवरची आंदोलनं पाहिली आहेत. त्यांच्यावर कधीही शेतकरी संघटनेच्या आंदोलनावर झाला तसा अमानुष लाठीहल्ला झाला नाही ! राजकीय पक्षाच्या आंदोलकाना अटक केलं जातं, गाडयात बसवून नेण्यात येतं आणि संध्याकाळी सोडून देण्यात येत–

'पण आपल्या आंदोलनात मात्र पोलीसअत्याचाराला सीमा उरत नाही! खेरवाडी स्टेशनला शेतकरी रुळावर शांतपणे नग्न होते, त्या वेळी तिथला पोलीसअधिकारी म्हणाला– 'तुमच्या पुढाऱ्यांनी तुम्हाला हात बांधून बसायला सांगितलं आहे ना ?– मग बसा बघू तसे !'– आणि मग त्या अधिकाऱ्यानं शेतकऱ्यावर अश्रुधूर सोडला, लाठीहल्ला केला आणि गोळीबार करून दोघांचा जीव घेतला !

'त्यानंतर जिथं जिथं शेतकरी आंदोलनाला बसले त्या त्या ठिकाणी आंदोलकाना काठयानी झोडपून काढलं. काहींच्या सायकली, मोटारसायकल्स जे असेल ते मोडून-तोडून टाकलं, शेतकऱ्याची डोकी फोडली आणि अशा प्रकारे आग्रारोड खुला केला !

'ह्या तऱ्हेच्या वागणुकीला शेतकरी घाबरतो असं मुळीच नाही. पोलिसांच्या हातात काठया आहेत आणि शेतकऱ्यांच्या हातात काही नाही हे खरं आहे. शेतकऱ्यांची तरुण मुलं माझ्याकडे येतात आणि म्हणतात– 'नुसता आदेश द्या, आम्ही पोलिसाच्या ह्या सैन्याला योग्य उत्तर देतो !' मी ह्या तरुण मुलांना बजावून सांगतो, 'असं काही करू नका. आपल्याला केवळ आजचा दिवस किंवा हे एकच आंदोलन जिंकायचं नाही. आपल्याला संपूर्ण देशभर शेतकरी संघटना उभी करायची आहे. त्यासाठी आपल्याला संपूर्ण शांततामय मार्गांनी सत्याग्रहच करायचा आहे !

'पण आज अशी परिस्थिती आहे की सरकार आपल्याला शांततामय सत्याग्रह देखील करू देत नाही. सत्याग्रहाचं हत्यार देखील आपल्याकडून सरकारनं काढून घेतलं आहे आणि म्हणूनच शेतकऱ्याच्या तरुण मुलाना ज्याना शेतकरी संघटनेचं काम करण्याची जबर उत्कंठा आहे, इच्छा आहे, त्यांना एस. आर पीकडून जनावरां-प्रमाणे बदडून घेण्यासाठी मी अजिबात पाठविणार नाही ! शासनानं सध्या नऊशे गाडया भरून एस् आर पी आणले आहेत. हे लोक जोपर्यंत हत्यारं सावरून उभे आहेत तोपर्यंत आपण त्यांच्या आसपास आता फिरकायचं नाही. त्यांचा फुकटचा मार खायचा नाही !

'ह्यापुढं आपण लढयाचा एक नवा मार्ग काढू. हा मार्ग इतका बहारीचा असेल की आपल्याला काहीही त्रास न होता शेतमालाच्या भावाच्या आंदोलनाला फार मोठी चालना मिळेल! योग्य वेळ येताच नवा आदेश तुम्हाला मिळेल. तोपर्यंत आजपासून अठ्ठेचाळीस तास आपली सुट्टी असं समजून प्रत्येकानं विश्रांती घ्यावी !

'वस्तुतः रस्ता अडवायचा ही कल्पनाच आमच्या आंदोलनात मुळात नव्हती. आपला लढा बांधावरचा होता, तो आपल्याला रस्त्यावर का आणावा लागला आणि पोलिसांच्या लाठया कुणामुळं खाव्या लागल्या ते नीट समजावून घ्या !'

'आमच्यातलेच, सहकारी साखरकारखान्याचे अध्यक्ष–संचालक ह्या मंडळीना भीती वाटू लागली की जर कारखाने फार काळ बंद राहिले तर पक्षाची मंडळी आपल्यावर कारवाई करतील, पुढच्या निवडणुकीच्या वेळी आपल्याला तिकिट मिळणार नाही, सरकार आपल्या पूर्वीच्या भानगडी आणि लफडी बाहेर काढील– म्हणून त्यानी आंदोलनाशी प्रतारणा करून कारखाने सुरू केले. ह्यामुळे एक फार मोठा फायदा झाला ! शेतकऱ्यांच्या बाजूचे कोण आणि शेतकऱ्यांचा घात करणारे कोण हे आपल्याला आता समजून चुकलं !

'बांधावरचा लढा रस्त्यावर आणण्यापूर्वी आम्ही मुख्यमंत्र्यांशी,

इतर संबंधित मंत्र्याशी संपर्क साधण्याचा खूप प्रयत्न केला; पण ही मंडळी साधं फोनवरून बोलायला देखील तयार नव्हती. पिंपळगाववसवंतच्या २ नोव्हेंबरच्या आपल्या शेतकरी मेळाव्यानंतर आम्ही मुंबईला ना. तिडकेसाहेबांच्याकडे चर्चा करण्यासाठी म्हणून गेलो तेव्हा ते म्हणाले–' अहो, तुम्ही हे जे आंदोलन सुरू केलय त्यामुळं सगळे शेतकरी शहाणे होतील !'

' आज आपल्यावर ज्या लाठ्या पडतात, गोळीबार होतो, त्याचं साधं कारण असं की, आता शेतकरी शहाणा होतोय ह्याची सरकारला भीती पडली आहे. ह्या आंदोलनात सरकारची शेतकऱ्यांबरोबरची वागणूक पाहून आम्ही तर आता आणखी थोडे शहाणे झालो आहोत. आमच्या शेतमालाच्या भावाचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे ह्याबद्दल आता आमची पुरेपूर खात्री पटली आहे.'

देवळे येथील शरद जोशींचं भाषण संपलं. त्यानंतर लोकांनी जो प्रतिसाद दिला, त्यावरून एका गोष्टीबद्दल माझी खात्री पटली की, आता इथून पुढं शेतकरी संघटनेचं आंदोलन दंडुकेशाहीनं चिरडून टाकणं कुठल्याही पक्षाच्या सरकारला शक्य नाही. हे आंदोलन पसरणार ! शरद जोशींनी मांडलेले विचार महाराष्ट्रभर पसरणार–देशव्यापी होणार. ह्या खंडप्राय देशातील किसान प्रचंड प्रमाणावर जागृत होणार. तेहतीस वर्षांची गुलामगिरी झुगारून देणार आणि राजकारण्यांना पळता भुई थोडी होणार ! जागं होणाऱ्या किसानाला पुन्हा गुंगीचं औषध पाजून झोपविण्याचा जोरदार प्रयत्न केला जाणार हे नि:संशय; तो संघटित होत असताना त्याच्यात फूट पाडण्याचे सर्व तऱ्हेनं प्रयत्न केले जाणार. किसानानं केवळ जागं होऊन आता भागणार नाही.–त्यानं आता ' जागृत ' असण्याची वेळ आली आहे.

देवळ्याहून निघण्यापूर्वी सिगरेटस् घ्याव्यात म्हणून मी एका पानाच्या दुकानापाशी गेलो. तिथं चार-पाच शेतकऱ्यांच्यात जोरजोरात चर्चा चालली होती. शरद जोशींनी आपल्या भाषणात आंदोलकांना अठ्ठेचाळीस तासाची ' सुट्टी ' ' डिक्लेअर ' केली होती. त्याबद्दल मंडळी बोलत होती. त्यातील एकाला मी विचारलं, ' आंदोलन काही काळ स्थगित करण्याचा आदेश जोशींनी दिला.–त्यावर तुमचं मत काय ?' एक शेतकरी म्हणाला–

' शरद जोशींच्या आदेशामुळं सगळे शेतकरी आजपासून पुढील आदेश मिळेपर्यंत मागं येणार हे निश्चित–पण हे आंदोलन चालू ठेवावं असं मात्र प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात आहे हे देखील निश्चित. इथून पुढं सगळे जण शरद जोशींच्या नव्या आदेशाची वाट पाहणार !

' आज शरद जोशींनी अठ्ठेचाळीस तासासाठी आंदोलन मागं घेतलं ते योग्यच आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांच्या मागण्या आता सरकारला मान्य कराव्याच लागणार ह्यात वाद नाही. एसआरपीनं गोळीहल्ला केला तरी हरकत नाही–शंभर मरोत, दोनशे मरोत–आमच्या नेत्यांनी आदेश दिला तर आम्ही प्रत्येक जण मरायला तयार आहोत !

' नवा आदेश मिळेपर्यंत आम्ही स्थानिक पातळीवर काही निर्णय घेऊन आंदोलनाचा कार्यक्रम चालूच ठेवणार. आम्ही मार्केटकमिट्या बंद करणार. आमचा माल आम्ही गावातल्या गावात खाऊ घालणार, उरलेला कुजला आणि आमचं नुकसान झालं तरी हरकत नाही–गावातला माल बाहेर जाऊ देणार नाही. ह्याच्याशिवाय आता पर्याय नाही.

' आम्ही जाणतो की, आमचं आंदोलन चिरडून टाकण्यासाठी शासनापाशी पोलीस आहे, एसआरपी आहे, फौज आहे, गोळीबार आहे–वायरलेस वगैरे यंत्रणा आहे. जमावबंदी, भाषणबंदी, मिसा असले ' कायदेशीर ' अधिकार आहेत. एक-दोन जिल्ह्यातील शेतकरी म्हणजे त्यांच्या दृष्टीनं मच्छर आहेत, हे पण आम्ही चांगलं जाणतो.

' आम्ही आमच्या जिल्ह्यापुरता, निदान आमच्या तालुक्यापुरता तरी जरूर पडल्यास निर्णय घेणार आणि इकडचा माल तिकडं जाऊ देणार नाही. बघू काय होतं ते !'

ह्या शेतकऱ्यांना मला आणखी काही प्रश्न विचारायचे होते. इतक्यात शंकर वाघ घाईघाईनं आले. म्हणाले–' तुमचं रेकॉर्डिंग आटपा, आपल्याला दहिवेल इथं ताबडतोब जायचंय–तिथं ट्रकवाले आणि शेतकऱ्यात काही तरी तणाव निर्माण झालाय असं आताच कळलं–चला लवकर !'

मी झटपट जीपमध्ये चढलो. गाडी दहिवेलच्या दिशेनं भरधाव निघाली. शरद जोशी काहीसे विचारमग्न बसले होते.

¤

आम्ही दहिवेलला पोहोचलो तेव्हा वातावरणात एक विचित्र तणाव होता. आम्ही येऊन पोहोचण्यापूर्वी दोन-तीन तास अगोदर इथं दंगल झाली असणार. दहिवेलचे डॉ. मराठे शरद जोशींना सांगत होते–

' ११ तारखेला सायंकाळी ६ वाजता एसआरपी आणि ट्रकड्रायव्हर्सनी एकत्र येऊन शेवाळीच्या परिसरातील लोकांवर हल्ला केला आणि रस्ता मोकळा केला. तिथून सुटलेल्या गाड्या दहिवेलमधून ' पास ' झाल्या तेव्हा मला वाटलं की, संघटनेचा आदेश असल्यामुळं गाड्या सुटल्या असतील. त्या गाड्या दहिवेल येथून जात असता ड्रायव्हरलोकांनी इकडच्या लोकांना शिवीगाळ केली. थोडीफार दगडफेक केली. काही जणांना मारहाण केली. बऱ्याच ट्रक निघून गेल्यानंतर आम्ही पुन्हा इथं रस्ता अडवला आणि गाड्या थांबवायला सुरुवात केली. थांबलेल्या गाडीच्या ड्रायव्हरांना आम्ही सांगितलं, ' तुम्ही विनाकारण ह्या संघर्षात पडू नका. एसआरपी आणि आम्ही काय ते बघून घेऊ ! अडकलेल्या ड्रायव्हरांची आम्ही रात्री भाकरीची सोय केली–शाळेमध्ये झोपण्याची व्यवस्था केली.

' आज सकाळी (१३ नोव्हेंबर) साडेअकरा-बाराच्या सुमारास एकदम दंगल आणि दगडफेक सुरू झाली. ट्रकवाले दगडफेक करू लागले, गावातून लोक दगडफेक करू लागले–सरदारजी ड्रायव्हर्सना मार पडला. ज्यांना लागलं त्यांना मी ट्रीटमेंट दिली. एका सरदारजीकडं रिव्हॉल्वर होतं–त्यानं ते आपण होऊन माझ्या स्वाधीन केलं. आम्हीच पंचनामा करून ते जप्त केलं. इथं अजून पोलीस किंवा एसआरपी कुणीच पोहोचलेलं नाही.

' इथं आता शंभर दीडशे गाड्या आम्ही अडवून ठेवल्यात. गुजराथकडे–बडोदा, सुरत इथं जाणाऱ्या ह्या गाड्या आहेत. ज्या ड्रायव्हरमंडळींनी शेवाळीहून सुटल्यानंतर दहिवेलमधून जाताना लोकांना मारहाण केली त्या गाड्या पुढं निघून गेल्या आहेत इथं

दंगलीचा प्रकार काही तासापूर्वीच घडला. सात–आठ ट्रक्सचं नुकसान झालं. ड्रायव्हरांना मार पडलाय !

*शरद जोशींनी गावकऱ्यांची आणि ट्रकड्रायव्हराची एकत्र सभा* घेण्याचा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे तयारी करण्याचा कार्यकर्त्यांना आदेश दिला. शाळेच्या पटागणात सभा घेण्याचं ठरलं. मायक्रोफोन–लाउडस्पीकर ह्यांची जमवाजमव होईपर्यंत शरद जोशी रोडवर जाऊन ट्रकड्रायव्हर्सबरोबर बातचीत करू लागले. मी गावकऱ्यांना प्रश्न विचारून 'काय प्रकार घडला' ह्याची चौकशी करण्याचा प्रयत्न केला; पण मंडळीकडून समाधानकारक उत्तरं मिळेनात. मनमोकळं स्पष्ट बोलायला कुणीच तयार नव्हतं ! काही तरी भानगड होती हे निश्चित. मंडळी बोलायला उत्सुक नाहीत असं पाहून मी रोडवर जाऊन ट्रकड्रायव्हरांच्या मुलाखती रेकॉर्ड करू लागलो,

'हमारा ट्रक चाळीसगावसे अहमदाबाद जा रहा है। हम रहनेवाले राजकोटके।'

'गाववालोने ये रस्ता किस लिये रोका है?'

'शक्कर बनानेवाला जो गन्ना है उसके रेटके वास्ते इन्होने आदोलन करके गाडी खडा कर दिया.'

'आप कबसे यहाँ रुके है ?'

'कल् रातसे जी !'

'आपने यहाँ कोई शौर मचाया ? मारपीट की ?'

'जी नही–मारपीट करनेवाले तो कल् आगे निकल गये–हम बिलकुल बेकसूर है।'

'आपको यहाँ लोगोने कुच्छ खानापिना दिया ?'

'जी–कल रात रोटी खिलाथी और गावमे जो होटल है उसने हरएक चीज पच्चीस पैसे कम दामसे बेची.'

'यहाँ ये सब दंगल कैसे शुरू हुई ?'

'यकाएक जी–सुबह ग्यारा साडेग्यारा बजे।'

'आपको मार पडी ?'

'हां जी–और गाडीका बहोत नुकसान हुवा. गाडीमे भरा हुवा माल चुराया. बच्चोने बहोत शरारत की.'

दुसरा एक ड्रायव्हर सांगू लागला--

'मी नागपूरहून सुरतला चाललोय. मी सुरतचा रहाणारा. माझ्या ट्रकचं दोन–तीन हजार रुपयांचं नुकसान झालय–पण आम्हो ट्रकवाले म्हणतो–इकडच्या शेतकऱ्यानी आंदोलन करून भाव वाढवून घेतले तर आमच्या भाईबंधाना देखील *त्याचा फायदा मिळेल*–आमची शेती आहेच ना !'

एक मारपीट झालेला सरदारजी तावातावानं म्हणाला–

'एक गोष्ट लक्षात घ्या–आमच्या पंजाबमधील शेतकऱ्यानं जर आंदोलन सुरू केलं तर हे पोलिसवाले काही करू शकणार नाहीत–इकडचा तुमचा शेतकरी 'दुबला–पतला' आहे. पंजाबचा किसान तगडा आहे. तिथं आदोलनाचा मुकाबला करायला सरकारला फौजच बोलावावी लागेल.'

सरदारजीला वाजुला सारून एक दांडगा पंजाबी ड्रायव्हर धुसफुसत म्हणाला–

'*ये किसान जो गन्नेका रेट माँग रहे हो वो बराबर है लेकिन हमारी प्रायव्हेट लिमिटेड ट्रकका इस आदोलनसे क्या लेना देना है ?* हमारे गाडीका हालत देखो पुरा काच तोड दिया है, टायर फोड दिये है। कल् जो ट्रक्स यहाँसे निकल गयी उनके ड्रायव्हरोने यहाँ मारपीट की ये हम मानते है लेकिन हमने तो कुछ नहीं किया। करनेवाले तो चलगये, उनको गाववालोने कुछ नही किया। भाईसाब, हम पंजाब के है। हमारी भी खेती है लेकिन इनका ये तरीका हमको ठीक नही लगता.'

ट्रकड्रायव्हराच्या बरोबर बातचीत करत मी नुकसान झालेल्या गाड्यापाशी येऊन पोहोचलो. गाडीनंबर GTT 5267, APJ 2867, MHB 4383,–5985, APS 3263, OJC 84242 ह्या गाड्यांच्या काचा, दिवे, इंडिकेटर्स फोडून चकणाचूर करण्यात आला होता ह्या सर्व गाड्याच्या सहाही टायर्समधील हवा काढून टाकण्यात आली होती. हा सर्व प्रकार पाहून माझी तर शरमेनं मान खाली झाली. हा सर्व प्रकारच लाछनास्पद होता, दहिवेलच्या गावकऱ्यांना काळिमा फासणारा होता. मी ट्रकड्रायव्हर्सच्या मुलाखती घेत होतो तेव्हा डॉ. मराठे माझ्यावरोबर होते. 'हे असं घडायला नको होत' *असं ते सारखं पुटपुटत होते*. *माझ्या अवतीभवती जमा* झालेल्या ड्रायव्हर्सना उद्देशून मी म्हणालो, 'जे घडलं ते अतिशय घृणास्पद आहे ह्यात वादच नाही ! महाराष्ट्राचा एक नागरिक म्हणून मी तुमची सर्वांची माफी मागतो. तुम्हाला हात जोडून एकच विनंती तुम्ही नेहमी ह्या रस्त्यावरून येणारे–जाणारे कृपा करून झाला प्रकार विसरून ह्या गावावर किंवा रस्त्यातील दुसऱ्या गावावर राग काढू नका ! महाराष्ट्राबद्दल मनात 'गलतफैमी घेऊन, जाऊ नका ! मी पुन्हा तुमची सर्वाची माफी चाहतो !'

एक तगडा सरदारजी समजुतीच्या स्वरात म्हणाला, 'अरे आईसाब, इसमे माफी माँगनेकी क्या बात है ? चलो जो हुआ सो हो गया। हमारे पचास परसेंटसे उप्पर ड्रायव्हर तो इस आदोलनका साथ देना चाहते है किसानोकी कठिनाइयाँ हम अच्छी तऱ्हेसे जानते हैं !'

त्या दिलदार सरदाराचे मी आभार मानत असतानाच डॉ मराठे एका उंच्यापुऱ्या शरीरयष्टीच्या, धीरगंभीर चेहऱ्याच्या आणि बुलंद व्यक्तिमत्त्वाच्या सरदारजीना घेऊन आले आणि म्हणाले, 'ह्याच्याजवळ रिव्हॉल्वर होतं !' मी सरदारसाहेवांना सवाल केला.

'*ये रास्ता रोको आदोलनके बारेमें आपका क्या ख्याल है ?*'

'भाईसहाब, पहिली बात तो ये है कि मैं हूँ पंजाब का' गंभीर आवाजात ते सागू लागले 'वहाँ के अॅग्रिकलचरल युनियन का एक्स सेक्रेटरी हूँ. तेरा साल जिल्हा परिषद का मेंबर रहा हूँ। मेरा छोटा भाई पंजाब के मिराडा शुगर मिलका चेअरमन है। मैं इस किसान अॅजिटेशन के बारे में बहोत कुछ जानता हूँ। मेरी खेती है लेकिन अब ये ट्रक के बिजनसमे आया हू और नया गाडी लेके यहाँसे जा रहा था। साथमें मेरा आठ सालका बच्चाभी है।'

सरदारजी पढेलिखे आणि घरंदाज होते त्यांच्या बोलण्यात

## बातचीत.... ट्रकड्रायव्हर्सबरोबरची.... सरदारजी म्हणतात....

कमालीची आदब होती. वागणं एखाद्या राजपुत्राला शोभेसं. माझं कुतूहल जागृत झालं. मी म्हटलं–

' सरदारसाहेब आपल्याबरोबर आपली इजाजत असेल तर मला मनमोकळी चर्चा करायची आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्याच्याबद्दल पंजाबच्या सरदारजींच्या मनात कसलाही गैरसमज राहू नये अशी माझी इच्छा आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या किसानाच्या मनात देखील सरदारजी ट्रकड्रायव्हराच्याबद्दल काही तरी विपरीत कल्पना राहू नयेत असं मला वाटतं. महाराष्ट्रातील किसानानं शेतीचा लढा सुरू केला आहे. त्या आदोलनात पोलिसवाले रस्त्यावर अडकलेल्या ड्रायव्हरांना चिथावणी देऊन त्याच्या मदतीनं गावकऱ्याची मारपीट करीत आहेत त्यामुळं इकडच्या परिसरात एक वेगळाच असंतोष पसरत चालला आहे. महाराष्ट्राच्या शेतकऱ्याच्या मनात आणि पंजाबच्या ड्रायव्हरच्या मनात अकारणच तेढ निर्माण होत आहे. आपल्याशी बातचीत करून आपली मुलाखत मला प्रसिद्ध करता आली तर ही तेढ कमी करण्यास हातभार लागेल असं मला वाटतं. आपण ह्या झाडाखाली बसू या का ?'

सरदारसाहेबानी संमती दिली. मी झाडाखाली बसू लागताच त्यानी मला उठवलं. प्रथम आपल्या ट्रकमधली एक चादर काढून खाली बिछवली आणि 'आपको लस्सी तो नही पिला सकता' अशी माफी मागून सरदार जगजीतसिंग आपल्या आठ वर्षांच्या मुलाला शेजारी घेऊन बसले आणि सांगू लागले–

' काल शेवाळीहून मी आलो आणि रात्री इकडं अडकलो. दहिवेलच्या लोकानी रस्ता अडवला होता. रात्री त्यानी आम्हाला रोटी -बहुतेक प्रत्येक घरातून एकएक मागून आणली असावी–कादा चटणी आणि कढी असं जेवण दिलं. गावकरी आमच्याशी अतिशय सलोख्यानं–प्रेमानं वागले. सकाळी मी काही गावकऱ्याबरोबर बातचीत, करत होतो. त्याना मी सागितलं, तुम्ही जो भाव मागत आहात तो अतिशय योग्य आहे. आज खताच्या किमती वाढल्या आहेत, शेतकऱ्याला डिझल ' ब्लॅक' मधं घ्याव लागतं, वीजपुरवठा वेळेवर होत नाही, झाला तरी अपुरा. मी स्वत: किसान असल्यामुळं मला ह्या अडचणींची पुरेपूर कल्पना आहे-

' सरकार तुमच्या मागण्याकडे दुर्लक्ष करतय म्हणून तुम्ही रस्ता अडवलात ह्याबद्दलही माझं काही म्हणणं नाही–पण एक कृपा करा फार दिवस आमच्या ट्रक्स अडवून ठेवू नका. आम्ही आपल्याला पूर्ण सहयोग देऊ–पण एक दोन दिवस. सातआठ दिवस गाडी कृपा करून अडकून ठेवू नका. प्रत्येक गाडीवर कर्जांचा बोजा असतो–कुणावरती लाख दीड लाख–दोन लाख रुपयापर्यंत कर्ज असतं तशातच आम्हाला देखील डिझल ' ब्लॅक'नंच घ्यावं लागतं. गाडी थाबली तर ट्रकवाल्यांचं अतोनात नुकसान होतं.तेव्हां जास्त वेळ अडकवून ठेवू नका!' गाववाले म्हणाले की, शरद जोशीचा आदेश मिळाला तर आम्ही तुम्हाला लगेच सोडून देऊ !'

' आमची अशी बातचीत चालू असताना श्री. उत्तमराव पाटील एक्स मिनिस्टर तेथे आले. त्यांची एक सभा झाली. मी त्याना दिल्लीमधे पाहिलं होतं त्यामुळं लगेच ओळखलं त्याना देखील मी विनंती केली की गाववाल्याना आमच्या गाड्या सोडायला सागा! श्री पाटील म्हणाले, ' मी असा आदेश देऊ शकत नाही ...'

' त्यानंतर कुणी तरी एक तरुण ' लीडर' टाइपचा माणूस आला. कुठल्या तरी साखरकारखान्याचे आपण डायरेक्टर आहे असं तो सागत होता– मी तर त्याला ' लीडर' म्हणणार नाही, त्याच्यामधे ती पात्रता नव्हती. त्यानं गावकऱ्याना भडकविणारं भाषण केलं आणि त्यानंतर लोकांनी एकाएकी दगडफेक सुरू केली आणि फक्त सरदारजी ड्रायव्हराना पकडून मरायला सुरुवात केली. '

' ह्या भाषण करणारा कोण होता ?' मी डॉ. मराठेना प्रश्न केला. ते काही बोलले नाहीत. सरदारसाहेब पुढची हकीकत सागू लागले–

' आम्हाला एक गोष्ट पक्की माहीत आहे, ह्या राजकारणी लोकांना ' व्होट'शी मतलब आहे आणि शरद जोशीना फक्त ' रेट' हवा आहे. तर गावकऱ्यानी त्या ' लीडर'च्या भाषणानंतर दंगल सुरू केली. मी माझ्या गाडीजवळ उभा होतो– इतक्यात हल्ला सुरू झाला माझ्या मागील गाडीत एक सरदार होता त्याला सातआठ लोकानी घेरून बडवायला सुरुवात केली–दे लाठी–दे डंडा-बहोत मारपीट की। उसका सारा निस्म नीला पडगया । मेरा लडका तो डरके मारे रोने लगा–

' मै उन लोगो के पास गया और उनसे कहा–'भय्या ' हम लोगो की क्या गलती हो गयी है– आप क्यू मार रहे है ?' इतने मे पाच सात पथ्थर मेरेपे फेके गये. मेरे लडके के साथ लेके मै वहां से निकला । खेत मे घुसा । वहां कोई बुजुर्ग लोग थे उन्होने कहा–' सरदारजी, आप यहां मत रुकिये, ये लोग आपको मारेगे.'

' इतने मे पाच-छे आदमी मेरे पीछे आये–उनको हात जोडकर मैने कहा, भय्या, आप किसान है– हम भी किसान है. आप आपकी मागे मागो लेकिन ये मारपीट का काम छोड दो ! आपकी हमारी कोई जाती दुष्मनी तो नही. लेकिन वो नही माने– एक आदमी तलवार उठाके मुझे मारने आया. मेरे पास रिव्हॉल्वर थी. मैने निकाली नही, फायर नही किया. सिर्फ खमीज उठाकर उसको कमरपे बांधा हुवा रिव्हॉल्वर मैने बताया और बोला– ' अगर तुम तलवार चलाओगे तो मुझे रिव्हॉल्वर निकलना पडेगा !

' वो तलवारवाला इतना बहादूर था सिर्फ रिव्हॉल्वर देखतेही ' पिस्तोल हाये–पिस्तोल हाये' ऐसे चिल्लाते भागा. फिर मै आस्ते आस्ते चलके उस पहाड के नीचे, एक कॅनाल के किनारे जाकर बैठ गया. मेरा लडका मेरे साथ था

' थोडी देर के बाद, नहर के निकारे तीन–चार बुजुर्ग आदमी आकर पहुंचे–ये डॉक्टर मराठे सहाब भी उनमे थे मैने पहले उनको इशारा किया कि आप कृपा करके नजदीक मत आयीयेगा– मेरे पास लोडेड रिव्हॉल्वर है. वो बोलने लगे आप हमारे साथ चलो आपको कोई हाथ नही लगायेगा ? मैने कहा भाई, आदोलन का मूड है–पब्लिक का मूड गरम है– कोई उनका भरवसा नही दे सकता. एखाद घंटे के बाद वहां की स्थिती शात हो जायेगी और मै खुद आपने आप वहां आजाऊंगा.' लेकिन डॉ. मराठेसाहब बोलने लगे ' हम मा कसम खाते है. आपको कुछ नही होगा. आप चलिये हमारे साथ !

' मैने कहा ठीक है– ' आप मां कसम खाते है–मै आपके साथ चलूगा.' जाने से पहले मैने रिव्हॉल्वर अनलोड करके गोलियों के साथ डॉ. मराठेसाहब के हाथ में दिया और उनके साथ गाव में आया.

'जैसे ही हम लोग गाव की ओर पहुंचे कम से कम दोसो लोगोने मुझे घेर लिया और पीटा टाग में। लाठी पडी, सरपे लाठी– और ये हाथ देखिये फ्रॅक्चर हो गया–डॉ मराठेसाहबने ही इलाज किया वो पुरी तरह से जानते है क्या हुआ–

मी डॉक्टर मराठ्याच्या दिशेन पाहिलं. समतिदर्शक मान हलवत ते म्हणाले, 'सरदारजी सांगतात तसाच सर्व प्रकार घडला!'

¤

दहिवेलच्या शाळेच्या पटागणात शेतकरी आणि ट्रकड्रायव्हर्सची सभा भरली. शरद जोशीनी हिंदीमध्ये भाषण करून ट्रकड्रायव्हराच्या मनातील असंतोष कमी केला–गैरसमज दूर केले. त्यांच्या भाषणानंतर सर्वांच्या विनंतीला मान देऊन ट्रकड्रायव्हराच्या वतीनं सरदार जगजितसिंग ह्यानी समारोप केला. ते म्हणाले–

"सकाळी इथं जो प्रकार घडला तो श्री. शरद जोशीनी पाहिला नसला तरी वस्तुस्थिती त्याना समजली आहे माझं तुम्हा सर्व मंडळीना एकच सागणं आहे–विनंती आहे की, हे आदोलन फक्त किसानाचच आहे असं नव्हे तर आपणा सर्वांचं आहे. आज धनवान आणि पुजीपती सोडले तर सर्वांना विशेषतः किसानाना खतं, बियाणं, डिझल, जंतुनाशक औषधं ह्यांच्या वाढत्या किमतीनी हैराण केलं आहे· तुम्ही जे भाव सरकारकडून मागता ते तुम्हाला मिळालेच पाहिजेत. फक्त उसाचेच नाही–तर ज्वारी, गहू ह्यांचे सुद्धा रास्त भाव मिळाले पाहिजेत–अखेरीस मी एव्हढच सांगतो की, तुमच्या आंदोलनास आम्ही ट्रकवाले–विशेषतः पंजाबचे सरदारजी ट्रकड्रायव्हर पूर्णपणे पाठिंबा जाहीर करतो.'

सभा संपल्यानंतर मी सरदार जगजितसिंगना म्हटलं– 'सरदारसाहब, सुबह यहाँ जो हुवा उसे आप बिलकूल भूल जायिए यही आपसे एक रिक्वेस्ट है!'

शरद जोशीचा हात हातात घेत सरदार जगजितसिंग म्हणाले, 'एक बात तो हो गयी के बातचीत के बाद हमलोग दिलसे मिल गये– और सच पुछो जोशीसाब, तो इससे पहिलेही मिल चुके है–मैंने आपके अॅजिटेशन का स्टडी किया है, कर रहा हूं. इसके बाद पंजाब आयीए. मेरा मकान चंडीगड मे है, मै पता लिखके देता हूँ. लेकिन अचानक मत आना, क्योकी हम भी तो घुमते फिरते है. पहले प्रोग्रॅम देकर आयिए– फिर पजाब के गेहूंके बारेमे बात करेंगे– मै पुरा स्टॅटिस्टिक्स जमा कर रखता हूँ!'

सर्वांचा निरोप घेऊन आम्ही दहिवेल सोडलं. जीप सटाण्याच्या दिशेनं निघाली. माझ्या मनात एकच प्रश्न पिंगा घालत होता– ज्याच्या प्रक्षोभक भाषणामुळे दहिवेलच्या शेतकऱ्यानी सरदारजीच्या ट्रकचं नुकसान केलं, त्याना मारहाण केली, तो तरुण 'लीडर' स्वतःला साखरकारखान्याचा डायरेक्टर म्हणवणारा माणूस कोण असेल? कुठल्या पक्षाचा? त्यानं हा प्रकार सहेतुक केला असण्याची शक्यता आहे का? पण तेव्हढी अक्कल त्याच्याजवळ असणं शक्य आहे का? नसेल तर लोक तरी असे कसे एखाद्याच्या भडक भाषणानं सारासार विचार गहाण ठेवून पेटून उठतात?

दहिवेलला जे घडलं त्यापासून इतर गावातील शेतकऱ्यानी मात्र धडा घेण्यासारखा होता. शेतकरी संघटनेची चळवळ बदनाम करण्यासाठी, चळवळीला गालबोट लावण्यासाठी दहिवेलसारखे प्रकार इतर अनेक ठिकाणी 'घडवून' आणण्याची फार मोठी शक्यता आहे.

शरद जोशीचे विचार ऐकून जागं झालेल्या शेतकऱ्याला केवळ 'जागृत' राहून ह्यापुढं भागणार नाही. त्याला 'सावध' देखील असणं आवश्यक आहे.

¤

सटाण्याला पोहचलो तेव्हा दिवस मावळून दोन घटका उलटल्या होत्या. सर्व कार्यकर्त्यांनी सटाण्याला जमायच असं ठरलं होत.

आग्रारोडवर ठिकठिकाणी तुबलेला ट्रॅफिक सोडून दिल्यानंतर, शेतकरी पुन्हा शांतमय सत्याग्रहाला बसले तेव्हा पोलिसानी त्याना गुराप्रमाणे बडवून काढलं होतं. पोलिसांच्या अमानुष हल्ल्याला शेतकऱ्यांनी प्रतिहल्ला करून उत्तर द्यायचं असं ठरवल असत तर मात्र रक्ताचे पाट, नव्हे नद्या वाहिल्या असत्या. पोलिसाच्या आणि एस· आर. पी.च्या रक्ताच्या सर्व परिस्थितीचा अंदाज घेऊनच शरद जोशीनी आदोलकाना अठ्ठेचाळीस तासाची विश्रांती जाहीर केली होती. आंदोलन तात्पुरतं स्थगित करण्यात आलं होतं; पण अठ्ठेचाळीस तासानंतरचे आदेश काय? आंदोलनाचं स्वरूप काय?

शहरामध्ये बसून वर्तमानपत्रांचे अग्रलेख वाचून जी मडळी किंवा 'द्राक्षं आंबट' अशी अवस्था झालेले 'खुर्ची हरवलेले' राजकारणी शरद जोशीवर 'एकतंत्री निर्णय– एकसूत्री कारभार' असा आरोप करतात. खास त्याच्यासाठी शेतकरी संघटनेचे आदेश कसे ठरवले जातात ह्याची एक झलक म्हणून सटाण्याला जमलेल्या कार्यकर्त्यांच्या चर्चेमधील काही भाग मी वाचकांसमोर माडतो.

पहिला आदेश– 'केव्हाही, कुठलाही रस्ता बद' हा तर विशेष चर्चा न होताच ठरला. पूर्वसूचना देऊन 'रस्ताबंद' आदोलनासाठी सत्याग्रहीनी कायदेभंग केला तर त्याना अटक करण्याऐवजी बेदम मारहाण करण्यात येते हे ध्यानात आल्यानंतर, इथून पुढं 'रस्ता बंद' करताना 'पूर्वसूचना' न देण्याचाही कायदेभंग करायचा असा साधा सरळ अर्थ. म्हणजेच आपल्याला सोयिस्कर असेल तेव्हा केव्हाही आणि कुठेही, कधीही रस्ता बंद करायचा दुसरा आदेश काय असावा ह्याबाबत फारच रंगतदार चर्चा झाली– चर्चेत अनेकाचा सहभाग.

'मला तर वाटतंय की आपल्या सरकारची जी खाती आहेत ना– ही तहसील कार्यालय आपल्या तलाठीभाऊसाहेबाचं ऑफिस ह्याच्याबरोबर असहकार करावा!'

'ह्याच्याबरोबर असहकार म्हणजे नक्की काय करायचं? सातबाराचे उतारे आपण लिहितो का? आपल्याला सातबाराचा उतारा लागला की झक मारत तलाठ्याकडे गेलच पाहिजे– असं असताना असहकार म्हणजे नक्की काय करायचं?'

'अहो, म्हंजे तलाठ्याला को–ऑपरेशन द्यायचच नाही!'

'पण म्हणजे नक्की काय? तलाठ्याला आपल्या सहकार्याची गरज आहे का? आपल्यालाच मतरा वेळा त्याच्या पाया पडावं लागतं! तो काय वाट बघत बसलेला असतो का आपल्या कोऑपरेशनची?'

'मग शेतसारा भरायचा नाही! सारावंदी!!'

'अहो, पण हे काम इतकं सोपं नाही. तातडीनं होण्यासारखं नाही आणि आता ह्या घटकेला आदोलनासाठी सारावंदी कार्यक्रमाला अर्थ

नाही. आपण सारा भरतो जानेवारी महिन्यात आणि आता नोव्हेंबर मध्ये आपण सारावंदी जाहीर करून काय उपयोग ?'

'विरोधी पक्षवाले कृतीशील कार्यक्रम म्हणून काही तरी घोषणा देऊन उगाचच भुलावण करतात तशापैकी होईल— आत्ता साराबंदीचा उपयोग नाही हे खरं. वेळ येईल तेव्हा करू,पण आत्ता त्याचा काही उपयोग नाही—वर्तमानपत्रात येईल छापून 'शेतकरी संघटनेतर्फे साराबंदी जाहीर'— पण आज त्या कार्यक्रमाचा काही उपयोग नाही हे खरं !'

'आणि समजा आपण साराबंदी जाहीर केली तर सरकारवर त्याचा असा काय मोठा परिणाम होणार आहे ?' सारा म्हणजे ऐनकाळच्या पट्टया ! सरकार म्हणेल राहु दे चार वर्ष—काही बिघडत नाही आमच !! अहो, पन्नास पैसे एकर सुद्धा जमिनी नाहीत—ह्या साराबंदीचा काय परिणाम होणार ? त्यापेक्षा इरिगेशनपट्टया बंद करायचं काही जमतं का बघा !'

'इरिगेशन-पट्टीशी नका खेळू— पट्टी भरली नाही, थकबाकी झाली तर टिब्बल पट्टी बसते, पंचनामा होतो. मालेगाव तालुक्यात सोळा लाख रुपयाची इरिगेशनचो पट्टी लोबकळत पडली—आणि अगदी भाऊसाहेब हिरे असताना सुद्धा दोन वर्ष पाणी मिळालं नाही. इरिगेशनपट्टीच्या भानगडीत पडायच्या अगोदर पूर्ण विचार करायला पाहिजे. इरिगेशनचे कायदे फार कडक आहेत!'

'थोडक्यात काय तर शासनाच्या खात्याशी असहकार वगैरे 'पॉइंट'मध्ये काही फारसा अर्थ नाही. त्याउलट हे शासन चालविण्या साठी म्हणून ज्याना आपण निवडून देतो ते आपल्या प्रश्नाकडे लक्ष देत नाहीत म्हणून त्याचे राजीनामे मागण्याचं काही जमतंय का बघा !'

'लोकप्रतिनिधींचे राजीनामे !'

'ग्रामपंचायतीचे देखील मागायचे का ?'

'मागायला काही हरकत नाही—पण त्याचा आत्ता फारसा उपयोग नाही. तो गावपातळीचा प्रश्न आहे ?'

'म्हणजे पंचायत समिती, जिल्हापरिषद आमदार आणि खासदार ह्याचे राजीनामे मागायचे !'

'त्यानी दिले नाहीत तर ?'

'—तर घेरावो !'

सटाण्याची चर्चा संपली. आम्ही नासिक गाठलं तेव्हा रात्र बरीच उलटली होती. पत्रकारमंडळी शरद जोशींची वाट पहात होती. काही जण कुरकुरत होते की तुम्ही इतक्या उशीरा रात्री 'प्रेसनोट' देणार असला तर आम्हाला 'खबर' कळवायला उशीर होतो—दुसऱ्या दिवशी बातमी छापून येणं देखील कठीण होतं. प्रेसवाल्यांची तक्रार योग्य होती. मी मनात विचार केला नासिकऐवजी पिंपळगावबसवंत इथं जाऊन सरळ झोपलो असतो तर बरं झालं असतं. कारण शरद जोशी आता इतक्या उशीरा जे प्रेस स्टेटमेंट देणार त्याचा काहीच उपयोग नाही ! कुठ तरी बारकीशी बातमी येणार—

¤

पिंपळगावबसवंत. चौदा नोव्हेंबरची सकाळ. निरशा दुधाचा चहा पीत उन्हात अंग शेकत बसलो होतो. माधवराव खंडेराव मोरेचा मुलगा विक्रम वर्तमानपत्रं घेऊन आला—

मुंबईहून प्रसिद्ध होणाऱ्या एका वर्तमानपत्रान पहिल्या पानावर डाव्या हाताच्या कोपऱ्यात—'मुरुम आणि पिंपल्स—तेलकट चेहरा' ह्या जाहिरातीखाली आंदोलन स्थगित अशी बातमी देऊन, पन्नास वर्षे चवदार असलेल्या 'लोणच्याच्या' जाहिरातीखाली 'रस्त्यावर ठाण माडून बसलेल्या आदोलकांवर लाठीहल्ला !'अशी बॅनर टाकली होती. त्याचबरोबर 'आदोलकांनी तीन मालमोटारी जाळल्या' हे सांगण्याची दक्षता देखील त्यांनी घेतली होती. ह्याच वर्तमानपत्रातील त्या दिवशीचा अग्रलेख पुलिट्झर' नाही तरी कसल्या तरी 'पू' पारितोषकास पात्र ठरावा !

मुंबईहूनच प्रसिद्ध होणाऱ्या दुसऱ्या एका मराठी वृत्तपत्रानं 'अडथळे दूर करून मुंबई—आग्रा राजमार्ग आता खुला असा मथळा देऊन त्याखाली 'मालगाडीवर मालगाडी आदळली' असे शीर्षक देऊन धमाल उडविली होती.

पुण्याहून प्रसिद्ध होणाऱ्या एका वृत्तपत्राने, शरद जोशीनी प्रेस स्टेटमेंट दिले तेव्हापासून—अठ्ठेचाळीस उणे बारा असा बरोबर हिशोब करून 'शेतकरी आंदोलन ३६ तासासाठी मागे' असं हेडिंग टाकलं होतं. इथूनच प्रसिद्ध होणाऱ्या एका दैनिकानं— 'एस. आर. पीच्या क्रूर लाठीहल्ल्यात ५००० सत्याग्रही जखमी' ह्या मथळ्याखाली '४८ तास विश्रांती घेण्याचा शरद जोशीनी दिलेला सल्ला' असा चोख बॅनर टाकला होता आणि शताब्दिवर्ष साजरं करणाऱ्या एका पेपरनं 'रेल्वेच्या अपघातामुळं वाहतुकीचे प्रयत्न अयशस्वी' असा बाबुराव अर्नाळकरांच्या धनंजयाला देखील कोड्यात टाकणारा गूढ मथळा दिला होता.

वास्तविक 'वृत्तपत्रे आणि शेतकरी आंदोलन' हा एक स्वतंत्र विषय आहे—त्याबद्दल नंतर कधी तरी !

[क्रमशः]

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. दि. य. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

पुस्तके

# भगतसिंग आणि नास्तिकता

भगतसिंगाला एक स्वातंत्र्ययोद्धा म्हणून ओळखले जाते. भगतसिंग केवळ स्वातंत्र्य-योद्धा नव्हता, तर भारतातील मार्क्सवादी चळवळीच्या आरंभकाळातील मार्क्सवादी विचारवंत व मार्क्सवादाचा एक प्रवक्ताही होता. भगतसिंगाच्या व्यक्तिमत्त्वातील ही बाजू बरीचशी अपरिचित आहे. त्यामुळे भगतसिंग हा केवळ लढाऊ स्वातंत्र्यसैनिक एवढीच त्याची प्रतिमा सर्वांना परिचित आहे.

भगतसिंग लहान वयात म्हणजे २३ व्या वर्षीच मरण पावला! सुरुवातीच्या काळात तो गांधीवादी होता. त्यानंतर तो दहशतवादी बनला. त्याच्या राजकीय विचारसरणी आणि व्यवहार यांच्या विकासाला सुरुवात झाली सन १९२५ ते १९२८ या काळात, त्याने भरपूर वाचन केले होते, १९२८ साल संपण्यापूर्वीच त्याने समाजवाद हे आपल्या चळवळीचे उद्दिष्ट म्हणून स्वीकारले होते व संघटनेला 'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिक असोसिएशन' असे नाव दिले. जून १९२९ मध्ये अटक होण्यापूर्वी त्याने राजकारणातील सर्व मतमतांतरे, विशेषतः धर्माबद्दल सखोल विचार केला होता असे आढळून येते. १९३०-३१ मध्ये फाशी जाण्याची वाट पहात असता भगतसिंगाने लिहिलेले लेख मागोवा प्रकाशनाने प्रसिद्ध केले आहेत, या पुस्तकातील पहिला लेख 'मी नास्तिक का आहे?' हा सर्वप्रथम २७ सप्टेंबर १९३१ ला 'द पीपल' या लाहोरच्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला होता. दुसरा लेख ही एका काव्यसंग्रहाची प्रस्तावना आहे. लाला रामशरणदास या क्रांतिकारकाच्या स्वप्ननगरी या काव्यसंग्रहाला १५ जानेवारी १९३१ रोजी त्याने प्रस्तावना दिली. भगतसिंग व त्याच्या सहकाऱ्याचे लिखाण एकत्र करून प्रसिद्ध करण्यासाठी शहीद भगतसिंग रिसर्च कमिटी काम करत असते. तिने प्रसिद्ध केलेल्या, 'व्हाय आय अॅम अॅन अथीस्ट' या पुस्तिकेचा हा अनुवाद आहे.

पहिला लेख धर्म व नास्तिकता यासंबंधी आहे. आपण नास्तिकतेकडे कसे वळलो याबद्दलचे विवेचन या लेखात आहे. भगतसिंग लहानपणी धर्माने अतिशय प्रभावित झालेला होता. त्या काळच्या सगळ्याच राष्ट्रवादी तरुणांवर धर्म—गूढवादाचा प्रभाव होता. क्रांतिकारक बनण्यासाठी व आध्यात्मिक बळ प्राप्त करण्यासाठी धर्म व गूढवादाचा अवलंब त्याने केला होता. आपले सर्व अनुभव, स्वतःची धार्मिकता तो मोकळेपणाने मांडतो. क्रांतिकारकांना धार्मिकता, गूढवादाचा आश्रय का घ्यावा लागतो हे तो स्पष्ट करतो. राजकीय कार्याबद्दल वस्तुनिष्ठ आकलन नसल्याने धार्मिक अंधश्रद्धा व गूढवादाचा आश्रय क्रांतिकारक घेतात. क्रांतिकारी जीवनात वैयक्तिक मोहाविरुद्ध लढा द्यावा लागतो. नैराश्यावर मात करावी लागते, ऐहिक सुखे व कौटुंबिक पाशांचा त्याग करावा लागतो. प्राणाचा त्याग करण्याची तयारी ठेवावी लागते. त्यासाठी जे मानसिक बळ लागते ते मानसिक बळ वस्तुनिष्ठ नसल्याने धार्मिक गूढवादातून क्रांतिकारक शोधतात. स्वत:च्या क्रांतिकारक जीवनाची प्रेरणा भौतिक परिस्थितीतून घेण्याऐवजी ती धार्मिकतेतून शोधतात. समग्र त्यागाला प्रेरक शक्तीची गरज असते. प्रारंभीच्या क्रांतिरकांनी ही गरज धर्म व गूढवादातून भागविली. त्यांनी कृत्रिम आध्यात्मिक बेडया घेतल्या. भौतिक परिस्थितीतून, गुलामीतून प्रेरणा घेतलेले क्रांतिकारक भगतसिंगाने पाहिले होते. हे क्रांतिकारक शोषितांचे स्वातंत्र्यासाठी लढले. अशांना गूढवाद व धर्माची प्रेरक शक्ती म्हणून गरज नव्हती. त्यांच्याजवळ टीकादृष्टी व स्वतंत्र विचारशक्ती होती. टीकादृष्टी व स्वतंत्र विचारातून नास्तिकता आली. हे दोन्ही गुण क्रांतिकारकाला आवश्यक आहेत, असे तो सांगतो. हे सर्व लिहीत असताना भगतसिंगाच्या गळ्याभोवती फाशीचा फास आवळला जात होता अशा वेळी ईश्वराचा आश्रय घेणे सोपे असते याचीही त्याला जाण होती. ईश्वराच्या कल्पनेतून मनाला आधार मिळतो, हेही त्याला माहीत होते, परतु प्रखर मनोधैर्य त्याने भौतिक परिस्थितीतून शोधले. त्यामुळे त्याला धर्म वा गूढवादाची गरज राहिली नाही. म्हणूनच तो म्हणतो की, 'माणसाने विवेकनिष्ठ जीवन जगणे काही सोपे नाही. अंधविश्वासापासून समाधान किंवा आधार मिळवणे सोपे आहे; परंतु निरंतर विवेकनिष्ठ आयुष्य जगण्याचा प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे.' याच लेखात भगतसिंगाने धर्माची मूळ कारणमीमांसा ऐतिहासिक भौतिकतावादी, वास्तववादी शास्त्रीय पद्धतीने केली आहे 'सत्ताधारी आणि पिळवणूक करणाऱ्या वर्गांनी केवळ लोकांना फसविण्यासाठी, स्वतःचे वर्गीय विशेषाधिकार व सत्ता यांना मान्यता मिळवण्यासाठी, सामाजिक पातळीवर लोकांना शांत ठेवण्यासाठी धर्म निर्माण केला. धर्म हे या वर्गाच्या हातातले शस्त्र आणि त्याचा मित्र बनला आहे. ईश्वर ही संकल्पना नैराश्यात माणसाला उपयोगी पडते ईश्वर आणि धर्म यांनी असहाय व्यक्तीला खंबीरपणे आयुष्याला सामोरे जाऊन जगणे शक्य केले. 'निराश झालेल्या, फसवल्या गेलेल्याचा व असहाय माणसाचा परमेश्वर हा मदतनीस असतो.' भगतसिंगाचे हे विचार मार्क्सच्या विचाराशी मिळते-जुळते आहेत.

पण आता मनुष्य स्वत:च्या पायावर उभा राहिला आहे. आध्यात्मिक कुबडया फेकून देण्याचा प्रयत्न करीत आहे, असेही भगतसिंग सांगतो. आत्ममुक्तीचा लढा चालू झाला आहे, यामध्ये धर्माच्या संकुचित कल्पनेविरुद्ध देवावरच्या विश्वासाविरुद्ध लढणे आवश्यक झाले आहे असे त्याचे म्हणणे आहे. अशा तऱ्हेने धर्माबद्दल मूलगामी मार्क्सवादी विचार तो सांगतो.

दुसरा लेख ही स्वप्ननगरी या काव्यसंग्रहाला लिहिलेली प्रस्तावना आहे १९१५ साली जन्मठेपेची शिक्षा झालेले वृद्ध क्रांतिकारक लाला रामशरणदास यांच्या काव्यसंग्रहाची ही प्रस्तावना आहे या प्रस्तावनेतूनही भगतसिंगाचे मार्क्सवादी विचार दिसून येतात. हा लेख भगतसिंगाच्या काव्यात्म आणि रसाळ लेखणीतून उतरला आहे. या प्रस्तावनेत भगतसिंग जुन्या राष्ट्रवादी पिढीशी, ज्याच्यापासून लोकांवर प्रेम व ज्याच्यासाठी त्याग करण्याची प्रेरणा लाभली अशा क्रांतिकारकांशी आपल्या पिढीचा दुवा

सांधतो. त्याचबरोबर त्याच्याशी असलेले मत-भेदही व्यक्त करतो. केवळ परकीय सत्ता झुगारून देण्याच्या कल्पनेवर आधारलेला राष्ट्रवाद ते आमूलाग्र सामाजिक परिवर्तनाचा दृष्टिकोन हा स्वत:चा प्रवास अप्रत्यक्षपणे पहिल्या पिढीशी असलेले नाते व मतभेद यामधून सांगितला आहे.

याही लेखाच्या सुरुवातीला जुन्या क्रातिकारकाची धार्मिकता व गूढवाद व स्वतःची विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ भूमिका तो स्पष्ट करतो. भगतसिंगाच्या काळात हिंसा–अहिंसेचा प्रश्न ज्वलत झालेला होता. राष्ट्रवादी चळवळीतही दोन प्रवाह स्पष्ट दिसत होते= क्रातिकारकाचा हिंसेचा मार्ग व गांधीचा अहिंसात्मक मार्ग या दोन्हीबद्दल भगतसिंग विवेचन करतो. हिंसेचा आश्रय क्रातिकारक का घेतात याबद्दल तो म्हणतो, 'सत्ताधारी वर्ग हिंसा वापरतो, क्रातिकारकावर हिंसा लादतो म्हणून विषमतेवर आधारलेली समाजरचना दूर करण्यासाठी क्रांतिकारक अत्यावश्यक बाब म्हणून हिंसा करतात. क्रातिकारक हिंसेचे उदात्तीकरण करीत नाहीत किंवा स्वप्नाळूपणे हिंसेची पूजाही करीत नाहीत. आत्यतिक भयानक गरज असेल तेव्हाच ते हिंसा करतात!' क्रातिकारकांवर जनआदोलनावर सत्ताधारीवर्गच हिंसा लादतो. सुरुवातीच्या राष्ट्रवादी पिढीने हिंसेचे उदात्तीकरण केले त्यावर भगतसिंगाची टीका वरीलप्रमाणे आहे याच प्रस्तावनेत तो बौद्धिक व शारीरिक श्रमाबद्दल व प्रारंभीच्या स्वप्नाळू क्रातिकारकाकडून त्याकडे कसे चुकीच्या दृष्टीने पाहिले गेले ते सागतो. त्यानी बौद्धिक व शारीरिक श्रमात फरक मानला आहे. आज दोन्ही श्रमात दरी आहे हे तो मान्य करतो. दोहोतील दरी मिटवणे हे समाजवादी समाजरचनेचे मूलभूत तत्त्व आहे हे तो मान्य करतो, पण यात्रिक व स्वप्नाळू उपायानी दरी मिटणार नाही हा विचार ठामपणे तो माडतो. स्वप्ननगरी या पुस्तकाच्या आशयाबद्दल चर्चा करून, त्या आशयावर व त्यातील स्वप्नाळू व यात्रिक विचारांवर तो टीका करतो १९१४–१५ मधील क्रातिकारकाच्या विचारावर त्याने टीका केली आहे. प्रत्येक भिक्षेकऱ्याला भिक्षा मिळेल असा विचार लाला रामशरण दास माडतात तेव्हा भगतसिंग म्हणतो की, साम्यवादी समाजात धर्मादाय सस्था नसतील, गरजू गरीब असे कुणीच रहाणार नाहीत. भिक्षा देणे-घेणे दोन्हीही नसेल.

या प्रस्तावनेच्या शेवटी त्याने तरुणाना सदेश दिला आहे 'अधानुकरण करण्यासाठी किंवा जे लिहिले आहे तेच प्रमाण मानण्यासाठी कृपया ते वाचू नका. ते वाचा, त्याची समीक्षा करा आणि त्या आधारे तुम्ही तुमची स्वत ची मते बनवा!'

आजच्या राजकीय सामाजिक परिस्थितीत तर हा विचार फार मार्गदर्शक ठरणारा आहे. वाढती धार्मिकता, जातीयता या पार्श्वभूमीवर योग्य काळात ही पुस्तिका आली ते चागलेच आहे. दोन्ही लेख अनुवादित आहेत अनुवादही चागला झाला आहे, कंटाळवाणा रटाळ नाही. त्यामुळे ही पुस्तिका चागलीच वाचनीय झाली आहे याची दुसरी आवृत्ती निघत आहे हा पुस्तिकेचे स्वागत चांगले होत आहे याचा पुरावाच म्हटला पाहिजे.

—लता भिसे

**मी नास्तिक का आहे?**
लेखक शहीद भगतसिंग
मागोवा प्रकाशन, पुणे
पृष्ठे . ३४, किंमत : दीड रु.

---

फिनिक्स निवड

# The Brain

By Richard M. Restak
Doubleday & Co.

---

स्त्री मुक्ती आणि मेंदू याचा संबंध काय? वरवर तसा काही नाही; पण परवाच मी एक धक्कादायक मजकूर वाचला वरील पुस्तकात. त्या मजकुराचे अन्वयार्थ पुस्तकापलीकडे साडतील इतके व्यापक आहेत. एका न्यूरॉलॉजिस्टला मेंदूबद्दल संशोधन करताना असे आढळून आले आहे की, स्त्री आणि पुरुष याच्या मेंदूच्या कार्यात पुष्कळशी तफावत आहे थोडाफार फरक असेल याची जाणीव श्री. रेस्टॉकना होती; पण इतक्या बाबतीत व इतक्या प्रमाणात फरक असेल असे त्याना वाटले नव्हते. या फरकातील गर्भित व सूचक अर्थ याचा विचार आपण शेवटी करू.

मेंदू ही एक जगातील सर्वांत गुतागुतीची व गूढ वस्तू आहे, हे सर्वाना माहिती आहेच. याच विषयावर मी 'माणूस'मध्ये काही वर्षांपूर्वी मेरिलीन फर्ग्युसन यांचे The Brain या पुस्तकाविषयी लिहिले होते. त्यात त्या लेखिकेने असे लिहिले होते की, मेंदूवर अजून ३०० वर्षे अखंड संशोधन केले तरी पूर्णपणे त्याच्या कार्याचा उलगडा होणार नाही. यावरून सध्या आपल्याला मेदूविषयी किती कमी माहिती आहे हे समजेल. चंद्राविषयी आपल्याकडे तपशीलवर नकाशे आहेत. अथांग समुद्राच्या पोटात कोणकोणते पर्वत, डोंगर, रीजेस व दऱ्या आहेत त्याचेही नकाशे आपल्याकडे आहेत. शनीभोवती असलेल्या कड्याजवळ आपले यान गेले आहे, पण आपल्याच मेंदूकडे जायला आपल्याला तीनशेसाडेतीनशे वर्षे लागणार आहेत!

कदाचित मेरिलीन फर्ग्युसन ह्याचा ३०० वर्षांचा अंदाज चुकीचा ठरेल. तत्र व विज्ञानाची माहिती तर दर दहा वर्षांनी भूमितीच्या प्रमाणात वाढत असते आणि मानवी इतिहासात एखादे वर्ष किंवा एखादे दशक असे निघत असते की शोध व संशोधन याची जणू आतषबाजीच होते आणि या आतषबाजीने खुद्द भूमितीचे प्रमाण पण चक्रावून टाकणाऱ्या गतीने वाढते.

आत्तापर्यंत आपल्याकडे असलेले मेंदूचे ज्ञान मुख्यत्वे पुरुषमेंदूवर संशोधन करूनच मिळवले गेले आहे. याचे कारण युद्धात रक्तबंबाळ झालेल्या जवानाच्या मेंदूपासून वैज्ञानिकाना व डॉक्टर्सना अनेक गोष्टी शिकायला मिळाल्या. स्त्रियाचे मेंदूपण ढोबळपणाने पुरुषाच्या मेंदूसारखेच कार्य करीत असतील का हे शोधण्यासाठी काही डॉक्टर्स व वैज्ञानिकानी संशोधन सुरू केले. या संशोधनात त्यानी मुख्यत्वे सख्याशास्त्राचा अवलब केला.

संख्याशास्त्र हे फसवे असते असे म्हणतात; परंतु अनेक गोष्टीच्या पुढील संशोधनाचा उगम संख्याशास्त्रात असतो हेही तितकेच खरे. संख्याशास्त्राचे नियम व्यक्तिगत लावता येत नाहीत. तर मग अति हुषार स्त्रियानी हा लेख वाचून हिरमुसले होऊ नये व स्त्री मुक्ती चालू ठेवावी. कुडता-पॅन्ट पेहनावे. सिगरेटी

घ्याव्या. त्यांच्यासाठी हे निकष नाहीत.

एक गोष्ट वैज्ञानिकाना अशी आढळली की, स्त्रियांच्या मेंदूत काही अंगभूत व बायॉलॉजिकल फरक असतात व संस्कृतीचा त्याच्यावर काहीएक परिणाम होत नाही.

जन्मापासूनच मुली आवाजाविषयी अति सवेदनाशील असतात. पुरुषापेक्षा त्या उशीरा बहिऱ्या होतात. (Long live noise pollution !) आमच्या शेजारी मी अशा अनेक बायका पाहिल्या आहेत की जरा कुठे खुट्ट झालं की 'कोण ?' म्हणून डोकवणाऱ्या. मुलगी चारेक महिन्यांची झाली व आईने तोड जवळ केले तर ती बोबडे बोलेल; पण त्याच वयाचा मुलगा चित्र व आईचे तोड यातला फरक ओळखू शकणार नाही. तो 'बावळट' वटवट करेल. कोणतीही चलन-वलनाची मालिका मुली लवकर करू शकतात. (उदाहरणार्थ-नृत्य) हे फरक वरवर सामान्य वाटतील; परंतु मेंदूची सर्फीट्री, रसायनक्रिया वगैरे तांत्रिक गोष्टींचा ऊहापोह करण्याचे ठिकाण हे नव्हे.

हे सर्वांना माहीत आहे की, आपल्या डोक्यात मेंदूचे दोन भाग असतात. डावीकडचा व उजवीकडचा. प्रत्येक भाग आपापले वेगळे कार्य करीत असतो. डावीकडील भागाला जे कार्य दिलेले असते ते काम बायका अधिक कुशलतेने करू शकतात. त्याच्या अगदी उलट पुरुषाचे. बोलण्याचे काम डाव्या भागाकडे असते. (म्हणूनच इतकी चिवचिव व वटवट ! या कारणामुळे मुली बोलायला लवकर शिकतात. त्यांची शब्दसंख्याही जास्त असते, त्याच्यात तोतरेपणा किंवा इतर बोलण्याच्या उणीवा क्वचितच आढळतात. जवळजवळ नाहीच. या कारणामुळे मुली भाषाशास्त्रात नैपुण्य मिळवतात. त्याना विदेशीय भाषासुद्धा लवकर येतात

स्त्रिया ज्ञानसंचय ऐकून करतात. दुसऱ्यांना त्याच्या अनुभवाबद्दल विचारणे वगैरे. (माझ्या वाचनालयातील मुली असेच करतात.) भोवतालच्या परिस्थितीत एकदम झोकून देऊन शिकण्याचे त्या टाळतात. या उलट तुम्ही छोट्या मुलाबरोबर फिरायला गेलात तर, 'आई, त्या खड्ड्यात काय आहे ?' असे तो विचारणार. लहान मुली सहसा भोवतालचा परिसर शोधण्याचा प्रयत्न (explore) करीत नाहीत.

मुलांची दृष्टी अधिक तीक्ष्ण असते. शरिराच्या जलद प्रतिक्रियेच्या हालचालीमध्ये ती अधिक निष्णात असतात.

वेगवेगळ्या I. Q. टेस्ट असतात तशाच WAIS टेस्ट असतात. या टेस्टमध्ये कोणतीही शंका न ठेवता असे आढळून आले आहे की, मुलानी मुलीवर बाजी मारली.

तसे पाहिले तर शरिराचा आकार, हाडाचा सांगाडा, उंची, दात, वयात येणे हा सर्व फरक अगदी उघड आहे; पण मेंदूच्या कार्यात इतका नाट्यमय फरक असेल असे वैज्ञानिकांना वाटत नव्हते त्याचे असे म्हणणे आहे की, पुरुषाचे वर्तनच नुसते वेगळे नसते तर त्याचे विचारही स्त्रीपेक्षा अगदी भिन्न असतात (ऐकू नका, लक्ष देऊ नका; पण इ स. २००१ मध्ये कुडत्याचे, पॅण्टचे व सिगरेटचे वर्तुळचक्र पूर्ण होऊन परत डिसेंट साडी-ब्लाऊजकडे वळेल.)

कोणताही पूर्वग्रह न ठेवता या चाचण्या घेतल्या गेल्या होत्या. अर्थात एका पुरुषाने हे पुस्तक लिहिले, चाचण्या घेणारे डॉक्टर्सही पुरुष असतील वगैरे वाद आलाच. स्त्री-पुरुषाच्या शारीरिक भेदाव्यतिरिक्त या फरकाविषयी वाचून असे वाटते की, जणू स्त्री-पुरुषासाठी वेगवेगळ्या लक्ष्मणरेषाच आखून दिल्या आहेत.

मेंदूच्या इतर कार्याविषयी वाचले की, आपण आश्चर्याने थक्कच होतो. अंध व बहिरे कातडीद्वारा (मेंदूपर्यंत संवेदना पोचल्यामुळे) बघू व ऐकू शकतात असे शास्त्रज्ञानी प्रयोगद्वारा सिद्ध केले आहे एके ठिकाणी लेखकानी असे सिद्ध केले आहे की, 'The brain prosthesis work provides proof that the holistic concept of brain function is undoubtedly correct.'

आता आपण या लेखाच्याच संदर्भातील सूचक व गर्भित अर्थ बघू अलीकडे एक दोन पाश्चात्य लेखकानी Intercourse is a cheating business (biological polarisation) असा एक दृष्टिकोन त्याच्या कादंबऱ्यांतून किंवा लिखाणातून माडला आहे. तो खरा असेलही, नसेलही; पण आपल्याला विचारप्रवृत्त करणारा जरूर आहे. कोणतेही नवीन विचार हे आधी अल्पसंख्याकांनाच पटतात. कधीकधी तर ते अल्पसंख्याकांना सुद्धा पटत नाहीत. अनेक नवीन नवीन विचार त्या लेखकाच्या किंवा विचारवंताच्या देहाबरोबर आकार न घेता कुठे तरी विरून जातात. सॅम्युअल बेकेट व इतर absurd theatre च्या जनकानी म्हटले आहे की, कोणत्याही दोन व्यक्तीत १०० विचाराची देवाणघेवाण शक्य नसते. विचाराच्या दळणवळणासाठी आत्माभिव्यक्तीचा जो पटाईतपणा लागतो तो अल्पसंख्याकापाशीच असतो. तरी पण कधीकधी तर पट्टीचे लेखकसुद्धा कांगावा करीत असतात की, 'माझ्या लेखात मला हे सांगायचेच नव्हते' किंवा 'माझ्या कथेत, कादंबरीत तुम्ही जे सुचवता ते मला अभिप्रेतच नव्हते.' सराईत लेखकाची जर ही तऱ्हा तर मग सामान्य माणसाचे काय ?

सतत ३० वर्षे धारदार पातीसारख्या मेंदूने फ्रॉइडने बायकाचा अभ्यास केला. तीस वर्षांच्या शेवटी एकदा तो हतबल होऊन बोलून उठला, 'What does a woman want ?' ऑस्कर वाइल्ड, सॉमरसेट मॉम वगैरे अनेक नामवंत मंडळी समलिंगसंभोगाकडे का वळली ? मी 'माणूस'मधील 'फिनिक्स निवड' I Married A Bestseller या पुस्तकाच्या परीक्षणात एक

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य वहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

बातमी वाचल्याचे म्हटले होते. पाश्चात्य देशात एका पाहणीन असे आढळून आले होते की, समलिंग संभोगवाद्याना आपल्या भागिदाराच्या निकडीचे भान जास्त असते, (biological parity) अशा आशयाची ती बातमी होती. मी काही स्त्रियांबरोबर या विषयावर बोललो. या स्त्रियांचे विचार तसे बरेच पुरोगामी वाटले. वाटेल त्या विषयावर त्याची बोलण्याची तयारी होती. नवऱ्यापेक्षा मैत्रिणीच्या सहवासात आम्हाला जास्त मोकळे वाटत असल्याचे त्या म्हणाल्या. पुरुषाच्या मित्राच्या बाबतीतही तसेच. नवरा-बायकोच्या विचाराच्या देवाण-घेवाणीमधील अडथळ्यामुळेच एडवर्ड अल्बीचे who is afraid of Virginia Woolf लिहिले गेले. समागम हा जरी जीवनाचाच पाया असला तरी समागमाची क्रिया हा जीवनातील अनेक पैलूमधील एक होय. या पैलूकडेही बघण्याचे अनेक दृष्टिकोन आहेत. त्यातला हा एक आहे. असल्या दृष्टिकोनातून आस्कर वाइल्ड व सॉमरसेट मॉमसारख्या लेखकाकडे उदारमतवादीपणाने बघताना मदत होईल. हू इज अफ्रेड ऑफ व्हर्जिनिया वुल्फचे प्रकार कमी होतील.

मी आधी एकदा सांगितलेच आहे की जीवन व त्याचे अनेकविध पैलू हे इतके व्यामिश्र व गुंतागुंतीचे आहेत की एकाच मानसशास्त्रीय पंथाने, एकाच इझम किंवा डॉक्ट्रिइनने, एकाच दृष्टिकोनाने, एकाच व्यापक विधानाने फार काय एकाच धर्माने, ते निकालात काढता येणार नाहीत.

आता थिएटर ऑफ द ॲबसर्डच्या जनकानुसार दोन व्यक्तीमधल्या विचारांचा दळणवळणाच्या अपयशाबद्दलच्या विचाराला जर या रेस्टॉक याच्या संशोधनाची जोड दिली तर माणसाचा सुप्रीम एकटेपणा स्त्री-पुरुष संबंधाच्या संदर्भात द्विगुणित होतो, हे उघड आहे. आपण असे गृहीत धरू की थिएटर ऑफ द ॲबसर्डवाल्याना दोन्ही पुरुषव्यक्ती अभिप्रेत आहेत दोन व्यक्ती म्हणजे ही जुळवणी आलीच. त्याच्या पुष्टीला आपण वरील परिच्छेदात माडलेले मुद्दे घेऊ. या सर्व मुद्द्याच्या बेरजेचा विचार केला तर inter course is a cheating business. It is a biological polarisation. ही वाक्ये भलतीच व्यापक व असत्य वाटत नाहीतच; पण या साऱ्या प्रकरणात मख्खी खास आहे असे शांतपणे विचार करणाऱ्यांना जरूर वाटेल. समागम हा जर फसवा असेल तर मग समागमातील विधी यालाच महत्त्व उरते. (Perfumed Garden या पुस्तकात आणखी माहिती दिली आहे!) म्हणजे कलात्मक विधी (foreplay) किंवा बलात्कार या दोनच गोष्टीत समाधान असते. पैकी बलात्कार अर्थात् विकृत आनंद. मी बलात्काराचे किंवा समलिंगीसभोगाचे समर्थन करीत आहे असा कृपया कुणीही अर्थ काढू नये. (मला तसे सांगायचे नव्हते!) मी फक्त एक दृष्टिकोन माडत आहे.

एकूण हा विषयच इतका नवीन आहे की, काही कथा-कादंबरीकाराना याची पार्श्वभूमी घेऊन माणसाच्या बिकट अवस्थेबद्दल पुष्कळ काही लिहिता येईल. थोडेसे काही माणसाच्या विक्षिप्त अवस्थेबद्दल आले की स्वीडिश ॲकेडमी नोबेल प्राईज देते. तसेच ज्ञानपीठवाल्यांनीही करावे.

जीवनात आणखी असे अनेक विरोधाभास आहेत. ते सहन न होणारे आत्महत्या करतात किंवा मेंटल ब्लॅक होलमध्ये गायब होतात.

हिटलर गेला. कॉन्सन्ट्रेशन कॅम्पस्मधील प्रयोग संपले; पण नियतीच्या प्रयोगाने सारी वसुधराच एक कॉन्सन्ट्रेशन कॅम्प झाली आहे. विश्वातील जणू एका विकसित संस्कृतीने इथे प्रयोगादाखलच जीवनाचे बीज पेरले आहे. (Nobody has a more tightly closed mind than the hard boiled rationlist.) आणि वाक्याच्या एका फटक्यासरशी इंग्रजी ही इंटरनॅशनल भाषा आहे, ती इंटरगॅलॅक्टिकही आहे असे मानून आपले दुःख ती निकालात काढते, 'Gentlemen, you have your guniea-pigs. We have our own. Squares it up, Gentlemen.'

—जे. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | **The Fifth Horseman**—(Bestseller–A city held in nuclear ransom)—Larry Gollins & Dominig Lapirre. | Rs. | 118/55 |
| 2) | **Satyajit Ray's Art**—Firoze Rangoonwala | „ | 65/— |
| 3) | **Hongkong**—(A Pictorial portriat) | „ | 94/— |
| 4) | **Clint Eastwood**—(Biography)—Agan Patric | | 95 p. |
| 5) | **The Life of Ian Flaming**—(Biography)—John Pearson. | „ | 30/— |
| 6) | **A Spell From Laker**—(On cricket & Cricketers past and present)—Jim Laker. | „ | 107/25 |

✦ Don't buy expensive books! Join 'Phoenix'!!

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**

# रंगभूमी

राजा पोखरापूरकर

# ईडीपस

## न पेललेली कलाकृती

फार दिवसांची 'ईडीपस' पाहण्याचा योग आला. सॉफक्लीझ येतोय, शिवाय 'ईडीपस'च्या अवतारात राज्य नाट्यस्पर्धेत पहिले बक्षीस मिळालेय या सुखद कल्पनेत भरत नाट्य मंदिरमध्ये स्थानापन्न झालो. यथासांग सोपस्कारानंतर नाटकाच्या सुरुवातीस निवेदन केले गेले. राजा ईडीपस कसा होता, काय होता, कोण होता वगैरे. निवेदनांवरून वाटले खरेच राजा ईडीपस असा होता काय? निवेदनातील सत्य हे निवेदनापुरतेच मर्यादित असल्याने तेवेढेसे काही मनावर घेतले नाही. निवेदनानंतरसुद्धा बरेचसे कुतूहल जागृत होते. एक बरे होते या प्रयोगाला (?) मध्यंतर नव्हते!

सदानंद रेगेलिखित हे नाटक माधव वझे यानी अशोक जोशीच्या दिर्ग्दशनाखाली सादर केले. नाटक कसे नसावे याचा एक उत्कृष्ट आविष्कार म्हणून हे नाटक पाहण्यास हरकत नाही.समूहनाट्य हा एक धास्ती घालवण्याचा प्रकार समजूनच परीक्षकांनी याला पहिले बक्षीस दिले असावे. नाटकाचा प्रकार अभिनयाशी संबंधित असतो हे यातल्या ईडीपसला कोणी सांगितले नसावे काय? नाटकाचे लेखन पाहिले तर त्यात तशा काही फारशा चुका केलेल्या नाहीत असे म्हणता येईल; पण लेखकाचे लिखाण ईडीपस माधवाच्या तोंडून बाहेर पडते तेव्हा एक लक्षात येत नाही की, हे पद्यात्मक आहे की गद्यकविता? संवादफेक याला कोणत्याही नाटकात अनन्यसाधारण महत्त्व असते हे माधव वझ्यांना मला वाटते, माहीत असावे. मग 'गुरुजी आम्हाला वाचून दाखवितात' हा भास का व्हावा?

एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. ती म्हणजे ही एक शोकान्तिका आहे. केवळ शोकान्तिकाच. कारण सगळा शोकच आहे. वास्तविक पाहता आमचा आपला एक समज की, शोकान्तिकेत नाट्यही असते; पण येथे नाट्य नाही हीच एक शोकान्तिका समूहनाट्य हा समाजपरिस्थिती दाखविण्यासाठी वापरता येणारा एक उत्कृष्ट प्रकार; पण येथे असणारे पौरजन हे कपडे घातलेले (कारण ते पौरजनांचे होते म्हणून) पुतळे वाटले. या पौरजनांचा माध्यम म्हणून छान उपयोग करता आला असता. समूहाच्या बाबतीत आणखी एक गोष्ट म्हणजे नाटकात एवढ्या लेव्हलस् वापरूनसुद्धा पौरजन खालच्या लेव्हलवर कधीच का नाहीत? शिवाय या पौरजनांचे काम काय? एकदा सगळ्यांनी उजवीकडे बघायचे, दुसऱ्यांदा सर्वांनी डावीकडे बघायचे. मानवी जीवनावर पडलेल्या अज्ञेय अशुभाचे प्रतीक दाखविणाऱ्या या नाटकात धुपाचा वास मात्र छान होता.

आता जरा विचार नेपथ्य या प्रकाराचा. अशा प्रकारच्या नाटकाला—की ज्यात सृजनशीलतेस वाव आहे त्याचे नेपथ्य आकर्षक पाहिजे ते काही प्रमाणात होते ही गोष्ट निर्विवाद कबूल आहे. मग या परिस्थितीत इतक्या लेवलस् व लाइटस् वापरण्याचा अट्टाहास का? कदाचित नाटकांचा तात्कालिक परिणाम साधण्यासाठी असेल. समूहनाट्यात लाल डिमर वापरायलाच पाहिजे हा नियम असावा कदाचित आणि तोही फक्त ईडीपससाठी. येथे एक गोष्ट लक्षात येते की, अशा प्रकारे फक्त तात्कालिक परिणाम साधता येतो.

राजासारखा माणूस एक्झिट घेऊन शयन-महालातून प्रवेश करतो याचा तसा विचार करण्याची आवश्यकता वाटली नाही. कारण राजा ईडीपस हा असाच होता हे उत्तर. याच निमित्ताने थोडेसे. श्री. माधव वझे व त्याच्या अभिनयाबद्दल सागावेसे वाटते. सतत एकाच सुरात (काळी (३–४) च्या पट्टीत) वाक्ये अक्षरशः फेकीत राहणे ही कलाच आहे. काही वर्षांपूर्वी एक ईडीपसचा प्रयोग परदेशात पाहिल्याचे स्मरते; पण त्याच्यावरून ह्या प्रयोगाची निकृष्टता दिसून येते. राजा ईडीपसची व्यक्तिरेखा ही एक विकृत मनोवृत्तीची व्यक्तिरेखा दाखविण्यास हवी होती. त्याच्यातील व्यक्ति–असंबद्धता व त्याच्या आयुष्यातील गतघटनाची मालिका याचा फार जवळचा संबंध दाखविणे आवश्यक होते. माणसाच्या जीवनावर पडलेलं अशुभ अज्ञेय सावट हे परिणामकारकपणे दाखविणे येथे जमले नाही. ईडीपस असा का झाला हे माधव वझे यांना तोड न उघडताही परिणामकारक दाखविता आले असते; पण त्यासाठी नाट्य सादर करण्यापूर्वी कोणत्या गोष्टीला महत्त्व देणे जरूर आहे याचा सखोल विचार करणे आवश्यक होते. नुसते निवेदनात 'तो असा होता' हे सागणे म्हणजे Poor presentation of a powerful character (समर्थ व्यक्तिरेखेचे असमर्थ सादरीकरण) असेच म्हणावे लागते. 'श्यामची आई'मधील व्यक्तिरेखा समर्थपणे पेलणाऱ्या श्री. वझे यानी या व्यक्तिरेखेचा आणखी थोडासा अभ्यास करणे आवश्यक होते असे वाटते. कारण सर्व नाटक हे साहजिकच वझ्यानी आपल्या दुबळ्या खांद्यावर पेलून धरल्याने इतर व्यक्तिरेखा–ज्याना मूळ ईडीपसमध्ये तौलनिक महत्त्व होते त्या दूर फेकल्या गेल्यासारख्या झालेल्या आहेत तरीसुद्धा बेरीयास लक्षात राहून जातो.

ईडीपस याची मनोवृत्ती ही त्याच्या हावभावातून प्रकर्षाने जाणवावयास हवी होती. बुटका, हडकुळा, विकृत माणूस असा चालतो, बोलतो हे वझेकडे बघितल्यावर वाटले नाही, मूळ नाटकात असणारा ईडीपस ही एक अंगावर येणारी व्यक्तिरेखा आहे. येथे सारखे जाणवत होते की, हे माधव वझे आहेत, ईडीपस नव्हे. एक दुःख मनस्वी झाले ते काम पाहून. नाट्य व त्याविषयी अधिकारवाणीने बोलणारे श्री वझे याचा अधिकार नाटकात कोठेच जाणवला नाही. तसेच जूकास्टा व ईडीपस याच्यातील संवाद इतके निर्जीव का? जूकास्टा, क्रेऑन व ईडीपस याच्यातील संवादही लक्षपूर्वक ऐकले तरच समजतील. खरे पाहता या तिघामधील क्रिया-प्रतिक्रिया दाखविणे म्हणजेच नाट्य होईल. आणखी एक गोष्ट म्हणजे राजा ईडीपस स्टेजवर डोळे असताना आंधळ्यासारखा चालतो व आंधळा झाल्यावर शिस्तीत डोळस माणसासारखा चालतो हे कशासाठी? राजवेदी जी पवित्र समजली जाते तिचा उल्लेख फक्त प्रमुख पात्राकडून होतो व बाकीचे फक्त नमनासाठीच का?

बऱ्याच वेळा असेही म्हटले जाते, नाटकाकडे एक संपूर्ण अनुभव म्हणून पहावे; पण यात संपूर्ण अनुभव कोठेच आढळला नाही. तसे पाहिले तर या नाटकाचा आवाका प्रचंड आहे त्यामुळे तो आपणास झेपेल का नाही हेही पहावयास हवे होते. बरे, एवढे असूनही या नाटकात वापरलेले पार्श्वसंगीत मात्र काही प्रमाणात परिणामकारक होते असे म्हणण्यास हरकत नाही. किंबहुना याचे संगीत तयार करताना व्यवस्थित मेहनत घेतली गेली असावी. काही ठिकाणी ते नीट वाजविले गेले नाही, हा त्या नाट्यमंदिरातील दोष असावा.

शेवटी ईडीपससारखे नाटक, ज्याच्यावर बरेच काही चांगले करता येण्यासारखे आहे त्याना यापासून शिकण्यासारखेही भरपूर आहे.

□

**गांधी खून घटनेवर वेगळा प्रकाश**




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

## पुणे वार्ता....
पृष्ठ २ वरून

कोठारिया येथील बासष्ट वर्षांची सुजनकुंवर ही स्त्री पतीबरोबर सती गेली ! हाथीरेह इथे सरस्वतीदेवी नावाच्या स्त्रीने सुजनकुंवरचाच कित्ता गिरवला; पण सती जाण्यापूर्वी तिने स्वत.ची कैफियतही माडली आता जर आपण सती गेले नाही तर पतीची नि आपली चुकामूक होईल आणि पुढील जन्मी गाठ पडणार नाही या भीतीनं ही बाई सती गेली नाही, तर नवऱ्याच्या पश्चात आपले दीर-भावजय आपल्याला कशा तऱ्हेनं वागवणार आहेत हे त्या वृद्धेला स्वच्छपणं दिसत होतं. 'इलस्ट्रेटेड वीकली' च्या एका अंकात ही सर्व कहाणी छायाचित्रांसह स्पष्टपणं वाचकांसमोर ठेवण्यात आली; पण राजस्तानमधील शासनयंत्रणा मात्र या दोन्ही प्रकाराबाबत स्वस्थ आणि निर्विकार आहे. अधिकाऱ्यांनी खुलासा करताना असं सागितलं की, 'संबधित कुटुंबातील मंडळी कुणी सती जाणार असलं तर आधी तसं कळवतच नाहीत. सगळं झाल्यावर पोलिसाना समजतं.' म्हणजे चोर-दरोडेखोरानीही डाका घालण्यापूर्वी पोलीसकंट्रोलरला कळवलं नाही, त्यामुळं त्याना पकडता आलेलं नाही, कळवलं असतं तर आम्ही गेलो असतो, अशाच स्वरूपाचं हे स्पष्टीकरण आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर भारताच्या राजधानीत एक डिसेंबर या दिवशी एक अतिशय अभिनव मिरवणूक निघाली. दिल्लीच्या परेडग्राउंडवरून निघालेल्या या मिरवणुकीत बहुसंख्य राजस्थानी स्त्रिया सामील झाल्या होत्या. सुमारे आठशे वर्षांपूर्वी सती गेलेल्या एका 'झुनझुनची राणी' या राजस्थानी स्त्रीच्या *स्मरणार्थ दिल्लीत एक भव्य* 'सतीचं मंदिर' उभारण्यात येणार आहे त्यासाठी 'राणी सती सर्व सेवा संघ' नावाची संघटनाही स्थापन झाली आहे. सुमारे आठ लाख रुपये खर्चून विकत घेतलेल्या जागेत हे मंदिर उभारलं जाणार आहे. अर्थात जिथं हे नवं मंदिर बाधलं *जाणार आहे तिथं सतीचं एक छोटं मदिर* आहेच ! दरवर्षी तिथ एक जत्राही भरते. याच मंदिराचे वारकरी या मिरवणुकीत सामील झाले होते. आता इथं जर कन्याकुमारीच्या स्वामी विवेकानंद शिलास्मारकाप्रमाणे एखादं भव्य मंदिर उभं राहलं तर ते निश्चितच तीर्थयात्रेचं ठिकाण बनेल ! अर्थात भारतासारख्या देशात तीर्थक्षेत्राची संख्या एकानं वाढली याचं दु.ख नाही, तर नवं तीर्थक्षेत्र एका जुनाट, जवळजवळ गाडून टाकलेल्या रूढीला पुन्हा संजीवन देईल याची भीती इथं आहे !

या सर्व पार्श्वभूमीवरच आजच्या चर्चात्मक परिसंवादाचे *आयोजन करण्यात आले* होते.

सुरुवातीला मारवाडी समाजाचे प्रतिनिधी यांनी पुण्यातील मारवाडी समाजाच्या वतीने भाषण करताना राजस्थानात घडलेल्या सतीच्या प्रकरणाचा स्पष्ट निषेध केला व अशा घटना घडू नयेत म्हणून आपण जागरूक राहयलं पाहिजे असं सागितलं. त्यानतर बोलताना पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राम ताकवले म्हणाले की, 'सती जाण्याच्या या पुन्हा उचल खात असलेल्या प्रथेमागे समाजाचं फार विदारक चित्र दिसतं. ही प्रवृत्ती जोपासली जाणं समाजाच्या दृष्टीने हानि*कारक आहे कारण या कृतीमागे* स्त्री ही पुरुषाचं धन आहे, वैयक्तिक मालमत्ता आहे हा रानटी अवस्थेतला विचार दडलेला आहे.' डॉ. ताकवले यानी जुन्या काळी ही प्रथा कोणकोणती कारणं दाखवून सुरू करण्यात आली, तसच परदेशातही स्फिन्क्स किंवा तत्सम स्वरूपात ती कशी चालू होती याचं उत्तम विवेचन केलं.

दैनिक 'केसरी'चे संपादक चंद्रकात घोरपडे यांनी सुरुवातीपासूनच जोरदार आवाज लावला आणि 'सरकारचं डोकं ठिकाणावर आहे काय?' या शैलीत 'हे सर्व घडत असताना शासन काय झोपलं होतं काय?' हा प्रश्न त्यानी वारंवार विचारला. 'सतीच्या प्रथेचं पुनरुज्जीवन करण्याच्या प्रयत्नात आणि दिल्लीतल्या सतीच्या मंदिराच्या बांधकामाच्या प्रकरणात धार्मिकतेचे रंग केव्हा व कसे मिसळले जातील हे सागता येणार नाही, असा इशारा देऊन श्री. घोरपडे म्हणाले की, 'या प्रकरणी नंतर हवा तापेल तेव्हा सरकार आणि 'जबाबदार' विरोधी पक्ष कोणती भूमिका घेतील हे सागणं कठीण आहे.'

मोठमोठ्यांना जे साधत नाही व साधलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी (प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र

तिसरी आवृत्ती । किंमत बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

शेवटी आपल्या शांत संथ आवाजात श्री. नानासाहेब गोरे यांनी बोलायला सुरुवात केली. 'आपण पुष्कळ प्रगती केली असे म्हणतो खरे, पण अशा काही घटना वाचल्या; ऐकल्या की आपल्या समाजाचं पाऊल पुन्हा मागेच पडायला लागलं आहे की काय, अशी भीती वाटायला लागते,' अशी खंत नानासाहेबांनी या विषयावर बोलताना व्यक्त केली आणि आता स्त्रियानीच याबाबत सरसावून उभं राहावं, असं आवाहनही केलं.

¤

सभा तर संपली. सर्वच वक्ते पोटतिडकीने बोलले, पण पुढे काय? एक सभा, एकमुखी निषेध, सर्व संमत ठराव. पुढे काय?

या संदर्भात नानासाहेब गोरे यांनी व्यक्त केलेले विचार मननीय आहेत. आपल्या नेहमीच्या शैलीने सभेत समोरच्या श्रोत्यांशी संवाद साधत नानासाहेब म्हणाले होते, 'पति-पत्नीचे परस्परांवर अत्यंत प्रेम असते. हाच पती जन्मोजन्मी मिळावा अशी पत्नीची इच्छा असते आणि म्हणूनच पतीचा मृत्यू झाला की तीही सती जाते, असे सांगितले जाते. पण हे परस्परांच्या प्रेमातून घडत असेल तर मग जर पत्नी आधी निवर्तली तर पतीने सती जायला काय हरकत आहे? पण तसं घडत नाही. कारण स्त्रियाना अशा तऱ्हेने 'जाळा' म्हणणारेही पुरुषच आणि 'जाळू नका' म्हणणारेही पुरुषच! आणि स्त्रिया? त्या फक्त जळणाऱ्या! चितेवरच्या अनेक लाकडांपैकी एक लाकूड, समिधांपैकी एक समिधा ही स्थिती बदलली पाहिजे आणि ती स्त्रियानीच बदलली पाहिजे!'

एखाद्या वेलीला ज्या सहजतेने पाने फुटतात तसे नानासाहेबांचे विचार निर्माण होत होते. ओठावाटे फुटत होते, श्रोत्यांपर्यंत जाऊन भिडत होते. 'स्त्रियाच स्त्रियांच्या प्रगतीच्या मार्गातील धोंड आहेत' यासारखे परिसंवाद पुष्कळ होतात; पण त्यापुढे निष्पत्ती काही नाही! मागे पुण्यात 'सत्यम्, शिवम्, सुंदरम्' हा झीनत अमानचा चित्रपट लागला होता, तेव्हा पुण्यातल्या महिलांनी इथल्या डेक्कन टॉकीजवरच मोर्चा काढला; पण निर्मात्याकडून काही लाख रुपये कमावून ती नटी केव्हाच दुसऱ्या शूटिंगला निघून गेली होती! तिच्या घरावर मोर्चा नेण्याचे किंवा तिचे मन वळवण्याचे किंवा फिल्म इंडस्ट्रीतल्या जास्तीत जास्त नट्यांना या विषयाचं महत्त्व आणि गांभीर्य पटवून देण्याची गरज काही कोणाला भासली नाही.

पुष्कळ वेळा असंच होतं. एखाद्या घटनेमुळे आपण अस्वस्थ होतो, काही तरी केलंच पाहिजे म्हणून काही तरी करतोही, पण पुन्हा जे थंड पडतो ते कायमचेच! सतीच्या प्रथेचं पुनरुज्जीवन होऊ नये यासाठी 'लीग फॉर सोशल जस्टिस' ने अतिशय योग्य वेळी धोक्याचा कंदील दाखवला आहे; पण तो इशारा लक्षात घेऊन आपली पावलं योग्य दिशेने कशी पडतील आणि ते करत असताना अधिकाधिक स्त्रियांनाच या चळवळीत कस ओढता येईल याकडे लक्ष दिलं पाहिजे. इथून पुढील काळात स्त्रियांच्या प्रश्नांचा लढा हा स्त्रियांसाठी आणि स्त्रियांनीच चालवला पाहिजे!

—सुजाता देशमुख


"Start where You are,
With what You have.
Make Something of it
Never be satisfied."

*–G. W. Carver*

गेल्या वर्षीच्या माणूस दिवाळी अंकात आलेली–गाजलेली चरित्र कहाणी

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर

लवकरच पुस्तकरूपात प्रसिद्ध होत आहे.

राजहंस प्रकाशन, पुणे ३०